www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज


दैं. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 234 वा गुरुवार दि. ०८ मे २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# नियंत्रण रेषेवर पाकिस्तानकडून आगळीक, भारतीय नागरिकांच्या मृत्यूनंतर चोख प्रत्युत्तर देण्याचे लष्कराला आदेश

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय सैन्यदलांनी राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरमुळे खवळलेल्या पाकिस्तानी सैन्याने बुधवारी नियंत्रण रेषेनजीकच्या भागात मोठ्या प्रमाणात गोळीबार केली होता. या गोळीबारात १० हून अधिक भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला आहे. त्याशिवाय मोठ्या प्रमाणात मालमत्तेचंही नुकसान झालं आहे. पाकिस्तानने केलेल्या या आगळिकीनंतर आता भारतीय लष्करानेही पाकिस्तानी सैन्याला प्रत्युत्तर देण्याच्या दिशेने पावलं टाकण्यास सुरुवात केली आहे. तसेच नियंत्रण रेषेजवळ सामान्य नागरिकांना लक्ष्य करणाऱ्या पाकिस्तानी सैन्याला योग्य ते प्रत्युत्तर देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. भारताने केलेल्या एअरस्ट्राईकनंतर पाकिस्तानी सैन्याने जम्मू काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर मोठ्या प्रमाणात गोळीबार केला. यात काही सामन्य नागरिकांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, नियंत्रण रेषेवरील घडामोडींवर भारतीय सैन्य बारीक नजर ठेवून आहे. भारताचे लष्कर प्रमुख स्थानिक अधिकाऱ्यांच्या सातत्याने संपर्कात आहेत. तसेच नियंत्रण रेषेवर तोफांचा मारा करणाऱ्या पाकिस्तानला योग्य ते प्रत्युत्तर देण्याचे आदेश लष्कराला देण्यात आले आहेत. दरम्यान,भारताने दहशतवाद्यांच्या तळांना लक्ष्य करून केलेल्या हल्ल्यांनंतर पाकिस्तानी सैन्याने भारतातील नागरी भागांना लक्ष्य करून तोफांचा मारा केला होता. या हल्ल्यात नियंत्रण रेषेनजीर राहणारे अनेक नागरिक मृत्युमुखी पडले आहेत. त्यानंतर नियंत्रण रेषेवर तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे.



## रिक्षाची चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
पनवेल शहरातील विनम्र हॉटेल समोरील रस्त्यावर उभी करून ठेवलेली ७० हजार रुपये किमतीची रिक्षा अज्ञात चोरटयांनी चोरून नेण्याची घटना घडली आहे. राम कुमार सरोज (वय ४० रा.शिळफाटा) यांनी त्यांची काळ्या पिवळ्या रंगाची रिक्षा क्रमांक एम एच ०४ एफसी ६५१२ ही विनम्र हॉटेल समोरील रस्त्यावर उभी करून ठेवलेली असता अज्ञात चोरट्याने ती चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## दागिन्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
राहत्या घरातून कोणीतरी अज्ञात इसमाने सोन्याच्या दागिन्यांची चोरी कल्याची घटना पळस्पे येथे घडली आहे. सुरेश गायकर यांच्या राहत्या घरातून अज्ञात चोरट्याने जवळपास विविध प्रकारचे ९ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ज्वेलर्सच्या दुकानातून बुरखाधारी महिलेनें केली चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
पनवेल शहरातील विनायक ज्वेलर्स या दुकानात आलेल्या एका बुरखाधारी अज्ञात महिलेने हातचलाखीने सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याची घटना घडली आहे. सदर महिला या दुनाकात येऊन तिने सोन्याच्या कडा दाखवण्यास सांगून नंतर हातचलाखीने जवळपास २ लाख रुपये किमतीचा सोन्याचा कडा हा तिच्या कडील बाजूस हाताच्या बोटाने ढकलून तो बुरख्या वरती पडल्यावर तो बुरख्याच्या खिशामध्ये घालून ती निघून गेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे

## अवकाळी पावसाचा फटका; काही ठिकणी लागल्या आगीसह वृक्ष पडले उन्मळून

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)** पनवेल मध्ये अचानकपणे मंगळवारी रात्री तसेच बुधवारी धुपरी अचानकपणे आलेल्या अवकाळी पावसाचा फटका शहरी भागासह ग्रामीण भागाला बसून काही ठिकाणी आगी लागण्याचे प्रकार तर काही ठिकाणी मोठं मोठे वृक्ष उन्मळून पडले आहेत. अनेक ठिकाणी विद्युत पुरवठाही खंडित झाला होता. आज करंजाडे ग्रामपंचायत ऑफिसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा सर्वर बॉक्सला आग लागली होती याची माहिती पनवेल महानगर पालिका अग्नीशमन दलाला मिळताच त्यांचे पथक घटनास्थळी पोहचले यावेळी पाहणी केली असता असे निदर्शनास आले की, ग्रामपंचायत मध्ये पहिल्या मजल्यावर असणाऱ्या कॅमेरा सर्वर बॉक्सला शॉर्ट सर्किट मुळे आग लागली होती सदर आग तेथील रहिवाशी यांनी पाणी मारून आग विझविली होती यावेळी सदर पथकाने पाहणी करून कोणताही धोका नसल्याची खात्री करून घेतली. दरम्यान त्याचवेळी शहरातील किंग इलेक्ट्रॉनिक, तक्का जवळ झाड पडले असल्याची माहिती या पथकाला मिळताच ते परस्पर झाड पडल्याच्या ठिकाणी जाऊन पाहणी केल्या असता झाड रस्त्याच्या मधोमध पडलेले निदर्शनास आले. यावेळी त्यांनी चैन सॉ कटर च्या साह्याने झाडाच्या फांद्यांचे बारीक तुकडे केले आणि रस्ता रहदारी करता मोकळा करून दिला. त्याचवेळी शहरातील कॉंग्रेस भवन येथे ट्रान्सफॉर्मवरला आग लागली आहे अशी माहिती मिळतात सदर पथक वाहनांसह घटना स्थळी जाऊन पाहणी केली असता असे निदर्शनास आले की ट्रांसफार्मरच्या वोल्टेज बुशला आग लागली आहे सदर ठिकाणी करंट सप्लाय लाईन चालू असल्याने तेथील एम एस सी बी च कर्मचारी यांनी करंट सप्लाय लाईन बंद केली आणि आग विझवली



## विंचूर येथे वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे व व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**
**विंचूर:** विंचूर व परिसरात अवकाळी पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकरी व व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मंगळवारी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास अचानक वादळ वारे वाहू लागले व पाच वाजेच्या सुमारास पाऊस पडायला सुरुवात झाली जोरदार अवकाळी पाऊस सुरु झाल्यामुळे शेतामधील पिके झाकताना शेतकऱ्यांची फारच तारांबळ उडाली व नागरिकांची खूपच पळापळ झाल्याचे पाहायला मिळाले. परिसरात जोरदार अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे व कांदा व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अवकाळी पावसामुळे द्राक्ष बागांसह कांदे, भाजीपाला व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गेल्या दोन दिवसापासून विंचूर व परिसरात ढगाळ वातावरण तयार झाले होते. या वादळी वाऱ्यासह पडलेल्या मुसळधार पावसामुळे विंचूर येथील कृषी उत्पन्न बाजार आवारातील सात ते आठ कांदा व धान्य व्यापाऱ्यांचे शेड पडले आहे.

एस के ट्रेडर्स यांचे कांदा शेड पडल्यामुळे सहा ते सात लाख रुपयांचे नुकसान झाले व असे अनेक व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून काही शेडमध्ये साठवलेला कांदा खराब झाला तर काही शेड जमीन दोस्त झाल्यामुळे व्यापारी वर्गात आर्थिक संकट निर्माण झाले आहे



## कोर्लईच्या श्रद्धास्थानात 'माय-दे-देउस' उत्सव सोहळा जल्लोषात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
रेवदंडा परिसरातील ऐतिहासिक आणि श्रद्धेचा ठेवा असलेल्या 'माय–दे–देउस' यात्रेस प्रचंड उत्साहात सुरुवात झाली. कोर्लई आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारो ख्रिस्ती बांधव आणि भगिनींच्या उपस्थितीत या पारंपरिक उत्सवाने रेवदंडा परिसर भक्तिरसाने भरून गेला.ख्रिस्ती समाजाचा उत्सवभाव परंपरेला उजाळा, भक्तीभावाची साक्ष सैकडो वर्षांचा वारसा लाभलेल्या रेवदंडा गोळा स्टॉपजवळील प्राचीन माय–दे–देउस मंदिरात दरवर्षी फक्त ५ मे रोजी हा महाउत्सव साजरा केला जातो. या दिवशी कोर्लई येथून पारंपरिक पायदळी वारी करत ख्रिस्ती बांधव मोठ्या श्रद्धेने मंदिरात दाखल होतात. गेल्या महिनाभरापासून चालत येण्याची ही परंपरा जतन केली जात आहे.यंदाही सकाळी ९ वाजता प्रार्थना, आरती व विशेष पूजाअर्चा यांसह धार्मिक विधींना सुरुवात झाली. यानंतर माय–दे–देउस मातेची भव्य पालखी रेवदंडा बाजारपेठेतून निघाली. शिस्तबद्ध मिरवणूक, भक्तांचा सहभाग आणि भक्तिगीतांनी वातावरण भक्तिमय झाले होते. पालखी सोहळा विठोबा आळी मार्गे पुन्हा मंदिराकडे परतला. त्यानंतर मंदिर प्रांगणात कोर्लई चर्चचे फादर यांच्या मार्गदर्शनाखाली मान्यवर ख्रिस्ती बांधवांचा सत्कार करण्यात आला. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये योगदान देणाऱ्या व्यक्तींना गौरवण्यात आले. मंदिर परिसर सुंदर फुलांनी सजवण्यात आला होता, ज्यामुळे उत्सवाचे सौंदर्य अधिक खुलून आले.माय–दे–देउस उत्सव हा केवळ धार्मिक परंपरा नव्हे, तर कोर्लई आणि रेवदंडा ख्रिस्ती समाजाच्या सांस्कृतिक एकात्मतेचे प्रतीक आहे. प्रत्येक वर्षी हा उत्सव समाजाच्या श्रद्धा, भक्ती आणि परंपरेच्या जिवंततेचा साक्षीदार ठरतो.



## महाराष्ट्र दिनानिमित्त मलकापूर येथे महाराष्ट्र एक्सलन्स अवॉर्ड संपन्न

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**
महाराष्ट्राचे कानाकोपऱ्यातील आलेल्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सत्कार करण्यात आला आहे. महाराष्ट्र ग्रामीण न्युज व हिंदी मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने व त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र एक्सएलन्स अवार्ड 2025 चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रस्ताव ऑनलाइन मागवण्यात आले होते त्यावेळी 356 प्रस्तावांपैकी निवड करून 60 मान्यवरांना महाराष्ट्र एक्सलन्स पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र एक्सलन्स अवार्ड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निलेश तायडे सहा माहिती आयुक्त मंत्रालय मुंबई, होते तर प्रमुख पाहुणे भाई अशांत वानखेडे संस्थापक समतेचे निळे वादळ,धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, , प्रसाद भाऊ जाधव राष्ट्रवादी जिल्हा ऊपाध्यक्ष, बाळासाहेब दामोदर उद्योजक, बंडूभाऊ चवरे कॉंग्रेस नेते, फारुख शेख ज्येष्ठ पत्रकार लोकमत, दामोदर शर्मा शेतकरी नेते, वीरसिंहदादा राजपूत ज्येष्ठ पत्रकार होते. कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व प्रथम महिला संपादक तानुबाई बिरजे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमात पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक ,राजकीय ,कला, वैद्यकीय, वकील, उद्योजक अशा अनेक क्षेत्रातील कर्तुत्वान व्यक्तींचा सत्कार महाराष्ट्र एक्सएलन्स अवार्ड 2025 देऊन करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी पहलगाम येथे आतंकवादी हल्ल्यात मृत पावलेल्या नागरिकांना श्रद्धांजली देण्यात आली. यावेळी देशासाठी आपल्या प्राण्याची परवा न करता देशसेवा करणाऱ्या माजी सैनिकांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. महिलांसाठी मानाची असे समजले जाणारे गृहरक्षक दलामध्ये कार्यरत असणाऱ्या महिला होमगार्ड भगिनींचा सत्कार देखील या कार्यक्रमात करण्यात आला. सदर कार्यक्रमाला पत्रकार अजय टप, सतीश दांडगे , नथुजी हिवराळे,संदीप सावजी, प्रकाश थेट, राजेश इंगळे, विनायक तळेकर,समाधान सुरवाडे, स्वप्निल आकोटकर, धीरज वैष्णव, कैलास काळे, अनिल गोठी मयूर लड्डा,निलेश चोपडे, प्रमोद हिवराळे , सुधाकर तायडे, अपरेश तुपकरी यासह आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारत सुरवाडे सर यांनी तर आभार प्रदर्शन प्रदीप इंगळे यांनी केले




**महाराष्ट्र एक्सलन्स अवार्ड 2025 पुरस्कार प्राप्त व्यक्ती**
किरण सूर्यवंशी कृषी, सुरेश उत्तपुरे शिक्षण, प्रशांत कर्ह कला, महादेव बावरे शिक्षण, रुपेश अवचार सामाजिक, निळकंठ पाटील सामाजिक, गजानन चेक सामाजिक, बालाजी कांबळे सामाजिक, पूर्णाजी खोडके सामाजिक, जनार्दन काळे सामाजिक, सुकनंदन हांडे सामाजिक, शिल्पा देशमुख राजकीय, सारंग माळेकर राजकीय, अनिल दाहेलकर पत्रकार, मोहम्मद फारुख अब्दुल गफार, तमेशस्वर पांढरे पत्रकार, भीमकिरण दामोदर पत्रकार, गोपाळ कळस्कर पत्रकार, संजय भरडूक पत्रकार मिलिंद इंगळे पत्रकार, बाळू मुंगळे पत्रकार, अड मोहन शुक्ला विधी, शाहीर भीमराव अंभोरे कला, डॉ मनोहर शेगोकार वैद्यकीय, प्रेमदास वाकोडे वैद्यकीय, शारदा अंभोरे महिला व बालकल्याण, पूजा रडके उद्योजक, राजेश घुगे
अड भारती कुमावत बाल लैंगिकता लेखिका, डॉ. नयन महाजन विधी प्राचार्य, शरद तेलंग आरोग्य विभाग, गजानन नाकाडे उद्योजक विभाग

## पुण्यतिथीनिमित्त भगतसाहेबांना अभिवादन



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज (दि. ०७) स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या शेलघर येथील निवासस्थानी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, शकुंतला रामशेठ ठाकूर, कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे ज्येष्ठनेते वाय. टी. देशमुख, अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिकांनी भगतसाहेंबाच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करत त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन केले. थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगतसाहेबांच्या कार्यामुळे सर्वसामान्य माणसाला न्याय मिळाला. शिक्षण, न्याय देण्याचे काम त्यांनी केले. अहोरात्र समाजाची सेवा हाच त्यांचा उद्देश कायम राहिला. ८४ गावांचा न्याय निवाडा करत असताना कोणावरही अन्याय होणार नाही याची त्यांनी सामाजिक भूमिकेतून त्यांनी काळजी घेतली. स्वर्गीय भगतसाहेबांनी अहोरात्र सर्व समाजासाठी आपले आयुष्य वेचले. त्यांचा पुण्यतिथी कार्यक्रम शेलघर येथे संपन्न झाला. यावेळी अनेक मान्यवरांनी त्यांच्या शेलघर येथील निवासस्थानी भेट देऊन अभिवादन केले. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, संजय भगत, प्रकाश भगत, पांडुशेठ घरत, वसंतशेठ पाटील, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, जयवंत देशमुख, जयंत भगत, विश्वनाथ कोळी, सुभाष भगत, योगिता भगत, सुहास भगत, सुधीर ठाकूर, अरुण ठाकूर, अनुप भगत, विजय भगत, समीर भगत, रामचंद्र म्हात्रे, कृष्णा गोवंडी, संध्या मुंबईकर, निर्मला गोंधळी, हरेश म्हात्रे, कमलाकर देशमुख यांच्यासह ग्रामस्थांनीही अभिवादन केले.



# गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाकद येथे आज दिनांक06/05/2025 रोज मंगळवार ला एच एस सी 2025 बोर्ड परीक्षेमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकासमवेत कौतुक सोहळा मा. श्री प्रदीपरावजी देशमुख व प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव स्व. एडवोकेट आप्पासाहेब सरनाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाकद मध्ये विज्ञान शाखेतून 133 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते प्राविण्यश्रेणीत 65 विद्यार्थी उत्तीर्ण झाले प्रथम श्रेणीत 65 विद्यार्थी उत्तीर्ण तसेच द्वितीय श्रेणीत 03 विद्यार्थी उत्तीर्ण झाले कला शाखेतून 53 विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले होते.त्यापैकी प्राविण्यश्रेणीत 08, प्रथम श्रेणीत 27व द्वितीय श्रेणीत 13 विद्यार्थी उत्तीर्ण झाले विज्ञान शाखेचा 100% निकाल आणि कला शाखेचा 94.33% निकाल लागलेला आहे. विज्ञान शाखेतून प्रथम कुमारी अनुष्का अरुण देशमुख 90.50% गुण घेऊन प्रथम आली. सुरेश नयन राठोड 87.17 गुण मिळवत द्वितीय आला.तर स्वप्निल अंबादास खरात 84.83% गुण मिळवत तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. कला शाखेतून आदित्य सुभाष गायकवाड83.17% गुण घेऊन प्रथम आला. कुमारी वैष्णवी अंबादास इंगळे 80.00% गुण घेऊन द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. कुमारी वैष्णवी गजानन नरवाडे 79.17% गुण घेऊन कनिष्ठ महाविद्यालयातून तृतीय आली.प्रास्ताविकातून प्राचार्य सुभाष उमाळे सर यांनीविद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन उत्कृष्ट निकालांची परंपरा कायम ठेवली असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री प्रदीपरावजी देशमुख यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या गुणांचे कौतुक करून पुढील शिक्षणामध्ये शाळेचे नावलौकिक वाढवा व आपल्या पालकांचे नाव रोशन करा असे बोलून विद्यार्थ्यांशी संवाद साधत विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवून पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून आभार व्यक्त केले कनिष्ठ महाविद्यालयाच्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाला उपस्थित मा. प्रदीपरावजी देशमुख, प्राचार्य सुभाष उमाळे, श्री बंडूभाऊ हाडे, पर्यवेक्षिका वर्षाताई देशमुख, प्रा. शिवाजीराव देशमुख, डॉ.पतंगे साहेब तसेच मोठ्या संख्येने ,प्राध्यापक, प्राध्यापिका,शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.देविदास खरात यांनी केले.



# श्री कानिफनाथ महाराज मंदिर 19 वा वर्धापन दिन विविध धार्मिक कार्यक्रमांनी संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

केएमजी विभागातील मराठा आळी येथील कानिफनाथ महाराज मंदिराचा 19 वा वर्धापनदिन नुकताच विविध धार्मिक कार्यक्रमांने संपन्न झाला. या धार्मिक कार्यक्रमात सकाळी 07.00 वाजता महाराजांच्या मूर्तीवर मंत्रोच्चारात दुग्धाभिषेक,सकाळी 09.30 वाजता श्री सत्यनारायण महाराजांच्या महापुजेचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी 05.00 वाजता दत्तसेवा हरिपाठ मंडळ वरप तालुका पेण यांचे हरिपाठ, 07.00 वाजता हभप भगवान कदम, वरप यांचे प्रबोधनात्मक कीर्तन सेवा संपन्न झाली. तर कार्यक्रमाची सांगता रात्री 09.00 वाजता महाप्रसादाने करण्यात आली.नऊ नाथांपैकी एक असलेल्या श्री कानिफनाथ महाराजांच्या मंदिरात मराठा आळी ग्रामस्थांच्या वतीने वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होत असतात. दर वर्षी श्री कानिफनाथ महाराजांच्या मंदिराचे जीर्णोद्धार मराठा आळी ग्रामस्थांकडून करण्यात येत असून सदरील धार्मिक कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता उत्सव मंडळाचे अध्यक्ष प्रणय कडव, उपाध्यक्ष नितीन राजीवले, सेक्रेटरी नितेश भोसले, सहसेक्रेटरी विशाल चाचले, खजिनदार रूपेश चितळकर यांच्या मार्गदर्शनाखाली रूपेश जाधव, रोशन कडव, दिपक भगत, कल्पेश चितळकर, शेखर जाधव, स्वप्नील भोसले, संकेत लाड, स्वराज राजीवले, शेखर राजीवले यांच्यासह मराठा आळी ग्रामस्थ व महिला मंडळ पदाधिकारी सदस्य यांनी विशेष मेहनत घेतली.



# आयसीटी मुंबई द्वारे ‘ऊर्जा विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र’ स्थापन

## स्वच्छ ऊर्जा उपायांसाठी, प्रगत अणुऊर्जा तंत्रज्ञानात भविष्य घडवण्यासाठी आयसीटी करणार भारताचे नेतृत्व

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी**

माननीय अर्थमंत्र्यांनी अलीकडील अर्थसंकल्पात २०४७ पर्यंत १०० गिगावॅट अणुऊर्जा निर्मितीचे महत्वकांशी उद्दिष्ट जाहीर केले असून संशोधन व विकासासाठी तत्काळ २०,००० रुपये कोटींची तरतूद करण्यात आली आहे. राष्ट्रीय अणुऊर्जा अभियानाशी सुसंगत अशा, रसायन तंत्रज्ञान संस्था (ICT), मुंबईने ‘ऊर्जा विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र’ सुरू करण्याची घोषणा केली आहे. भारताला जागतिक अणुऊर्जा क्रांतीत अग्रस्थानी नेण्याच्या दृष्टिकोनातून हा निर्णय घेण्यात आला आहे. संशोधन, नवोन्मेष व औद्योगिक सहकार्य यामधील ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेता, हे केंद्र प्रगत अणुऊर्जा प्रणाली व कौशल्य विकासाचे राष्ट्रीय केंद्र म्हणून कार्य करेल. या उपक्रमाची घोषणा ६ मे २०२५ रोजी मुंबईतील आयसीटीच्या के.व्ही. ऑडिटोरियम मध्ये झालेल्या ‘अणुऊर्जा




विज्ञान आणि तंत्रज्ञानातील उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य’ या कार्यक्रमात करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या डॉ.अनिल काकोडकर (होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्यूटचे कुलपती आणि अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष) यांनी उपस्थित मान्यवरांना मार्गदर्शन केले. डॉ.अनिल काकोडकर, कुलपती, होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्यूट, माजी अध्यक्ष अणुऊर्जा आयोग,"स्वतंत्र आणि नवकल्पनांनी भरलेले विचार देणारे शैक्षणिक क्षेत्र देशाच्या आणि जगाच्या भविष्यास घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. सरकार दीर्घकालीन धोरणं ठरवताना याच क्षेत्राकडून मार्गदर्शन घेतं. एखाद्या देशाची प्रगती संशोधन आणि विकासावरच अवलंबून असते. अणुऊर्जा हे भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी आणि शाश्वत विकासासाठी खूप महत्त्वाचं क्षेत्र आहे. या क्षेत्रात संशोधन वाढवण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल मी रसायन तंत्रज्ञान संस्थेचं (ICT) अभिनंदन करतो," असे म्हणाले. वैज्ञानिक यश व सामाजिक प्रभाव यांची परंपरा लाभलेल्या आयसीटी ने भारताच्या ऊर्जा क्षेत्राच्या पुनर्रचनेसाठी पावले उचलली आहेत. हे केंद्र पुढील पिढीच्या अणुऊर्जा तंत्रज्ञानांवर लक्ष केंद्रित करेल – जसे की लघु मॉड्यूल रिऍक्टर (SMRS), सूक्ष्म मॉड्युलर रिऍक्टर्स (MMRS), हायड्रोजन निर्मिती आणि अक्सेलरेटर तंत्रज्ञान – जे भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी अत्यावश्यक ठरतील. प्रा.जे.बी.जोशी, कुलपती, आयसीटी यांनी सांगितले,“भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी धाडसी नवोन्मेष व ठोस कृती आवश्यक आहे. आयसीटीचे ऊर्जा विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र संशोधन, कौशल्य व तंत्रज्ञानाचा मुख्य स्तंभ ठरेल, जो आत्मनिर्भरता व शाश्वततेच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत असेल."

**आयसीटी केंद्राची असलेली मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :**

१०० MWE (मेगावाट विद्युत) क्षमतेच्या PWR (प्रेशर जल अणुभट्टी) आधारित लघु मॉड्युलर रिऍक्टर आणि ५ MWE क्षमतेच्या मोल्टन सॉल्ट आधारित सूक्ष्म मॉड्युलर रिऍक्टरसारख्या सुरक्षित, प्रगत रिऍक्टर्सचा विकास.

एमटेक,पीएचडी व पोस्ट-डॉक्टोरल अभ्यासक्रमांसाठी अणुऊर्जा क्षेत्रातील नव्या वैज्ञानिकांची ट्रेनिंग. (काकोडकर व शर्मा शिष्यवृत्तीसह) स्टार्टअप इन्क्युबेशन (स्टार्टअप पोषण केंद्र), धोरण सल्ला व आंतरराष्ट्रीय सहकार्याचे राष्ट्रीय केंद्र म्हणून कार्य. प्रत्यक्ष अनुभव आधारित शिक्षणासाठी अक्सेलरेटर सुविधा, सिम्युलेटरसह अत्याधुनिक प्रयोगशाळांची उभारणी. दरवर्षी १०० हून अधिक प्रमाणित अणुउर्जा तज्ज्ञ तयार करणारा व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम. हा उपक्रम भारताच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल आणि आयसीटी राष्ट्रीय संस्थेचा मान टिकून ठेवेल. हे केंद्र देशाच्या अणुऊर्जा क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवेल तसेच स्वच्छ, विश्वासार्ह व सुरक्षित ऊर्जेसाठी समर्पित वैज्ञानिक, तंत्रज्ञ व धोरण तज्ज्ञांची पिढी घडवेल.

# कै. सदाशिव कवठे व कै. राहुल मोकाशी दिवंगत सहकाऱ्यांना भावपूर्ण श्रध्दांजली

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

आपल्या कार्यकर्तृत्वाने प्रचंड लोकप्रिय असलेले जेष्ठ सहकारी अधिक्षक कै. सदाशिव कवठे तसेच युवा सहकारी स्वच्छता निरिक्षक कै. राहूल मोकाशी यांच्या निधनाने पनवेल महानगरपालिकेची मोठी हानी झाली आहे. अशा भावपूर्ण शब्दात आज पनवेल महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वतीने आपल्या दिवगंत सहकाऱ्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण व मौन बाळगुन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पनवेल महानगपालिकेचे परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ. वैभव विधाते, स्वरुप खारगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, मुख्य उपलेखापाल संजय जाधव, पालिका सचिव अक्षय कदम, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भगवान गीते, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर तसेच पनवेल महानगपालिका अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



**आदर्शवत व्यक्तिमत्व कै. सदाशिव कवठे**

शिक्षण, महसूल, करसंकलन आणि लेखा यांसारख्या महत्त्वपूर्ण विभागांमध्ये अत्यंत जबाबदारीने काम करुन लोकाभिमुख झालेले कै. सदाशिव कवठे हे लोकप्रिय असे व्यक्तिमत्व होते. संस्थेप्रती त्यांची आपुलकी संस्थेप्रती असलेला त्यांचा आदरभाव तसेच सर्व सहकाऱ्यांसमवेत असलेला स्नेहभाव या खेरीज संस्थे बाहेरील व्यक्तींशी असलेले त्यांचे आत्मीयतेचे संबंध हेच त्यांच्या अपार लोकप्रियतेचे वैशिष्ट होते. त्यांच्या या कार्यगुणांचा विचार करुन सर्वांनी तसे वागण्याचा प्रयत्न करावा हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल असे श्री मंगेश गावडे, डॉ. विधाते आणि सहकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

**होतकरु व प्रामाणिक कर्मचारी कै. राहूल मोकाशी**

स्वच्छता निरिक्षक म्हणून सोपावलेली जबाबदारी विनाविलंब व विनातक्रार सहजतेने पुर्ण करणारा एक युवा सहकारी म्हणजे कै. राहूल मोकाशी यांचे दुर्दवाने अपघाती निधन होणे ही बाब अजुनही मनाला पटत नाही. एक कर्तव्य भावना असलेला कर्मचारी आपण राहूलच्या रूपाने गमावला अश्या शब्दात त्यांच्या सहकाऱ्यांनी भावपूर्ण श्रध्दांजली वाहिली. यावेळी झालेल्या शोकसभेत सर्वश्री अरुण कांबळे, अनिल कोकरे, अनिल जाधव, यांनी ही आपल्या शोक भावना व्यक्त करुन उभयतांना श्रध्दांजली वाहिली.

# दापोली त आढळला व्हेल माशांच्या उलटी सारखा पदार्थ

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण प्रतिनिधी**
**योगेश सुतार**

दि ७ मे दापोली तालुक्यातील हर्णे बायपास रोड जवळील समुद्र किनारी असलेल्या दगडात मंगळवारी दि ६ मे दुपारी ५ ते ६ किलो व्हेल माशांच्या उलटी सारखा पदार्थ आढळून आला सदर पदार्थ दापोली पोलीस व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी पंचनामा करून ताब्यात घेतला आहे. व्हेल माशांची उलटी आहे का ही खातरजमा करण्यासाठी तो पदार्थ वन विभागाच्या नागपूर येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार असल्याची माहिती वन आधिकार्यानी दिली.




हर्णे येथील सामाजिक कार्यकर्ते वाजीद खान यांनी हर्णे येथील निसर्ग हॉटेल समोरील समुद्र किनारी दगडात व्हेल माशांच्या उलटी सारखा पदार्थ दिसून आला असल्याची माहिती पोलिसांना दिली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक विवेक अहिरे यांनी ही माहिती पत्राद्वारे वनविभागाला दिली. त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण देशमुख उपनिरीक्षक राजकुमार यादव परिक्षेत्र वनाधिकारी प्रकाश पाटील. व त्याचे सहकारी दुपारी २.३० ला हर्णे समुद्र किनारी पोहोचले. त्यांना हा उलटी सदृश पदार्थ दगडात अडकलेल्या स्थितीत आढळून आला. सदर पदार्थाला मोठ्या प्रमाणात वाळू लागलेली असल्यामुळे तो धुऊन पंचनामा करून वनविभागाच्या ताब्यात देण्यात आला आहे. वनविभागाच्या आधिकार्यानी हा पदार्थ व्हेल माशांची उलटी असल्याची साशंकता व्यक्त केली आहे. हा पदार्थ खात्री करण्यासाठी नागपूर येथील वनविभागाच्या प्रयोग शाळेत पाठवणार असल्याची माहिती वनविभागाचे परिक्षेत्र वनाधिकारी प्रकाश पाटील यांनी दिली.

# अचानकपणे आलेल्या पावसामुळे पनवेलकर सुखावले

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** गेल्या काही दिवसांपासून तापमानाने अक्षरशः कहर केला होता. सकाळपासूनच उन्हाचा तडाखा आणि दमट हवामान यामुळे नागरिक हैराण झाले होते. पण आज दुपारी सुमारे बारा वाजता आकाश अचानक गडगडू लागलं, विजा कडाडू लागल्या आणि काही क्षणांतच जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. उकाड्याने त्रस्त झालेल्या पनवेलकरांसाठी हा पाऊस एक सुखद गारवा घेऊन आला. गेल्या काही दिवसांपासून तापमानाने अक्षरशः कहर केला होता. सकाळपासूनच उन्हाचा तडाखा आणि दमट हवामान यामुळे नागरिक हैराण झाले होते. पण आज दुपारी



सुमारे बारा वाजता आकाश अचानक गडगडू लागलं, विजा कडाडू लागल्या आणि काही क्षणांतच जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. उकाड्याने त्रस्त झालेल्या पनवेलकरांसाठी हा पाऊस एक सुखद गारवा घेऊन आला. गेल्या काही दिवसांपासून तापमानाने अक्षरशः कहर केला होता. सकाळपासूनच उन्हाचा तडाखा आणि दमट हवामान यामुळे नागरिक हैराण झाले होते. पण आज दुपारी सुमारे बारा वाजता आकाश अचानक गडगडू लागलं, विजा कडाडू लागल्या आणि काही क्षणांतच जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. उकाड्याने त्रस्त झालेल्या पनवेलकरांसाठी हा पाऊस एक सुखद गारवा घेऊन आला. गेल्या काही दिवसांपासून तापमानाने अक्षरशः कहर केला होता. सकाळपासूनच उन्हाचा तडाखा आणि दमट हवामान यामुळे नागरिक हैराण झाले होते. पण आज दुपारी सुमारे बारा वाजता आकाश अचानक गडगडू लागलं, विजा कडाडू लागल्या आणि काही क्षणांतच जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. उकाड्याने त्रस्त झालेल्या पनवेलकरांसाठी हा पाऊस एक सुखद गारवा घेऊन आला.

# वाढदिवस केवळ एक निम्मित...

जन्मदिवस म्हटलं की एक वेगळा आनंद जो सर्वांसाठी असतो पण सर्व जण तो वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करतात मात्र आमच्या सारखा माणसांच वेगळ च असत वाढदिवस असो की इतर काही आम्ही केवळ लिहन्यायाचा प्रयत्न करणार. डिजे, बुके, सेलेब्रेएशन व शुभेच्छा या गोष्टी सोडल्या तर जन्म दिवस म्हणजे विशेष काय..? आपल्या वयात वाढ होणे. की आयुष्याची काही वर्षे आपण पूर्ण केलीत याची आठवण करून देणारा दिवस? म्हणायचे इतकेच की जग खूप मोठ आहे यात आपण काय करतो किंवा आपण काय केलं याला अगणिती महत्व आहे. शेकडो, हजारो लोकांचे जन्मदिवस रोज जगभर साजरी केले जातात. मात्र ३६४ दिवसा त्यांना कोणीही ओळखत नाही हीच शेवटची खंत आयुष्य आहे. अनेक जबाबदाऱ्यांच्या ओझ्या खाली बहुतेक सर्वजण असतात. दैनंदिन जीवन जगत असताना आपण आपल्या प्रथम कामाला प्राधान्य दिले पाहिजे, काम करत असताना थोड जगा वेगळं आपण जगलं पाहिजे थोड छोट का होईना आपण आपलं साम्राज्य निर्माण करावं. काम करत असतांना महत्वाची माणसं सोबत ठेवली पाहिजे योग्य माणसांची साथ आपल्याला लाभली तर आपण योग्य मार्गाने परिक्रमा करतो. असो आपला हा विषय आजचा नाही... आपल्या हितचिंतकांनी आपल्या बद्दल संवेदना व्यक्त करणे भले मोठे मोठे फालतू काही हि लिहून जे आपण केलेलच नसत ते व्हॉटसअप स्टेटस, फेसबुक वर पोस्ट, इंस्टाग्राम वर स्टोरी ठेवणं म्हणजे वाढदिवस असतो का? असा प्रश्न नेहमी मला पडतो.. आयुष्यात वेळेला बंधन असावं आणि केवळ स्टेटस स्टोरी ठेवण्यापुरते आपण मर्यादित नसावे. एकवेळ स्टेटस ठेवू नका पण आपल्या मित्रांच्या वेळेवर कामी या. याच सर्वांच्या सर्वांसाठी शुभेच्छा असतात. अगोदर काही दिवसांपूर्वी काम नसतांना मी देखील दिवसभरात सर्वांचे स्टेटस ठेवायचो मात्र आता ते शक्य नाही. मग याचे कारण असे होते का की, माझा मीत्रांबद्दल माझा मनात संवेदना नाहीत. मुळीच नाहीत मात्र आपण आपले आपले दैनंदिन जीवन जगले पाहिजे व संकटांच्या काळात आपल्या मित्रांना होईल ती मदत आपण केली पाहिजे. या मताचा माणसं मी आहे. केवळ बड्डे पार्टी पुरतेच मित्र नसावे आपल्या आयुष्याचे स्टेटस बदलणारे मित्र असावे. असेच माझा आयुष्य माझे काही मित्र आहेत. ज्यांना आमच्या आयुष्यात काय घडतंय हे नेहमी माहिती असतं परंतु ते केव्हाही तुम्हाला माझा सोबत फोटोत दिसणार नाहीत मात्र काळजाच्या कप्पात त्यांची जागा मात्र परफेक्ट त्यांनी तयार करून ठेवलीय. मित्र वणव्यामध्ये गारव्या सारखा ते उगाच नव्हे तर मला शून्यातून इथं पर्यंत येण्यातही माझ्या मित्रांचा समावेश आहे. आज सुद्धा मी काय करतोय याची बहुतांश कल्पना माझा घरच्या माणसांना नाही. मात्र आपण जावं तिथ आपला माणूस उभा असतो हीच आपल्या आयुष्यातली खरी संपत्ती आहे.. वाढदिवस एक निम्मित असेल शुभेच्छा स्वीकारण्याचे तत्पूर्वी वर्षभर सर्वांच्या शुभेच्छा मला मिळत असतात. काम करत असताना मागील काही दिवसामध्ये 3 ठिकाणी कामाची दखल घेऊन 1. राष्ट्रसंत भगवान बाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण २०२४, अहिल्यानगर येथे

2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकारिता राज्यस्तरीय पुरस्कार २०२४

3. केंद्रीय मानवाधिकार संघटन नई दिल्लीच्या वतीने संविधान गौरव पुरस्कार हे पुरस्कार देऊन सन्मान देण्यात आला हे केवळ आपण करत असलेल्या कामामुळे.. जीवनाचा आनंद हा सुगंधापरी दरवळावा सर्वांच्या सहकाऱ्याने वर्षं आनंदाचे जावे याच सर्वांच्या शुभेच्छा मिळाव्यात. एक वेळ आनंदात नव्हे पण संकटात नेहमीच आम्ही देखील असू. आज सुद्धा मी व माझे बंधू ज्ञानेश्वर मुंढे जेवलात का झोपलात का म्हणून एकमेकांना फोन केला नाही. मात्र ६ – ७ वर्षाच्या मैत्रीपूर्ण संबंधातून महत्वाच्या माणसांसोबत आम्ही जोडत गेलो एका ठिकाणी तालुका प्रतिनिधी म्हणून आम्ही काम करायचो तिथ पासून संपादक केवळ नावालाच नव्हे तर पुढे कायम स्वरुपी पेपर सुरळीत चालूच राहणार याची सुद्धा उत्तम काळजी




घेऊन आणि विशेष म्हणजे रोजारोटी कडे ध्यान देऊन सुद्धा आम्ही काम करत आलोय, नाही तर मग रोज संध्याकाळी मित्र आहे म्हणून 19 चे रिचार्ज मारून द्या असे काम करत बसणे म्हणजे मैत्रीपणा नव्हे, आपल्या प्रत्येक मित्राला जास्त नाही परंतु दैनंदिन खर्च मिळेल इतके तरी काम मिळवून देणं आपल काम असतं आणि प्रथम तर आपण ठरवून टाकलं पाहिजे मला ही गोष्ट करायची आणि ते ठाम पणे सांगता आले पाहिजे की होय असे केल्याने मी उद्या च्या उज्वल भविष्यासाठी तयार असू शकेल. एकदा ठरलं आणि एकदा आपण बाहेर पडलो की सर्व गोष्टी आपल्याला मिळतात आपल्याला काय घ्यायचं हे आपण ठरवलं पाहिजे निर्णय घेण्याची क्षमता आपल्या कडे असली पाहिजे. आपण ठरवले ते होणार यात चिंता करण्याची गोष्ट नाही. काळ आणि वेळ खूप कठीण आहे सध्याच्या घडीला नौकरी मिळणे कठीण झाले आहे. नैराश्य पत्कारून कितीतरी आत्महत्या वर्षभरात होतात, आता मागे 3-4 दिवसापूर्वी नीट ची तयारी करणाऱ्या मुलाने आत्महत्या केली तर का? प्रथमदर्शनी पालकांनी आपल्या मुलांना त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याचे ओझे लादले नाही पाहिजे. आज आम्ही जास्त नव्हे पण ४ – २ रुपये कमावतोय आणि विशेष म्हणजे समाधानी आहोत. या मागे कारण काय तर माझ्या आई वडिलांनी मला कधीच सांगितले नाही की हे कर ते कर त्यांनी मला सांगितले काय करायचे कर आज सुद्धा ते मला इतकंच सांगतात काय करायचे कर पण मी स्वतःच्या निर्णयावर ठाम तो ठामच शासनाची नौकरी आपल्याला करायची नाही. पण का? असा प्रश्न मला केव्हाही पडत नाही, तो इतरांना पडत असावा. पण त्यामागे बहुतांश कारणे असतात असो... मित्रहो आज उद्या पुढील जीवनात देखील आमच्या कडून नवनवीन कल्पनाना वाव देणाऱ्या हालचाली होत राहतील आपण केवळ शुभेच्छा देण्यापुरते मर्यादित न राहता आमच्या सोबत काम केल्यास किंवा आमच्यात विलीन झाल्यास खऱ्याअर्थाने आम्हाला शुभेच्छा मिळाल्या असे मी गृहीत धरेल जन्मदिवस हे केवळ एक निम्मित झाले मात्र सोबत असाल तर तुमच्या वर्ष भर शुभेच्छा लाभेल. अंतकारापासून...

# हरित पनवेल साठी सर्वतोपरी प्रयत्न करणार अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी यावर्षी पनवेल महानगरपालिकेमार्फत मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवडीची मोहीम आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेण्यात आलेली आहे. वृक्ष लागवडी सोबत महानगरपालिका हद्दीतील काही सार्वजनिक ठिकाणीही विविध वृक्षांची लागवड करून ' हरित पनवेल 'करावे, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी आज दिनांक ६ मे रोजी मुख्यालयात झालेल्या बैठकीत दिले. या बैठकीसाठी उपायुक्त स्वरूप खारगे, सहायक आयुक्त श्रीराम पवार, सर्व प्रभाग अधिकारी, उद्यान व्यवस्थापक उपस्थित होते. स्थानिक परिस्थितीचा अंदाज घेऊन त्या ठिकाणी सहज लावता येतील अशा वृक्षांची निवड करून तो भाग, तो प्रभाग हरित करावा, या कामासाठी स्थानिक सोसायटींची मदत यकामी घ्यावी. प्रसंगी संबंधित झाडे जगविण्यासाठी त्या सोसायटीला विनंती करावी,असेही श्री .शेटे यांनी यावेळी सांगितले. प्रायोगिक तत्त्वावर पनवेल मनपा हद्दीतील एखादी स्मशानभूमी, एखादे उद्यान निवडून त्या ठिकाणी वृक्षांची लागवड करावी. तेथील अडचणींचा विचार करून पुढे वृक्ष लागवड मोहीम अधिक जोपासावी, वाढवावी. यासाठी समाजातील सर्व घटकांची मदत घेणार असल्याचेही त्यांनी या बैठकीत सांगितले.



**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## सत्यदेवी बनवसकर (भुरे )राज्यस्तरीय नारिशक्ती पुरस्काराने सन्मानीत

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशन महाराष्ट्र अर्थात सर फाउंडेशन महाराष्ट्र आणि वुमन टीचर्स फोरम महाराष्ट्र यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त दिला जाणारा राज्यस्तरीय नारीशक्ती सन्मान पुरस्कार 2025 हा रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मोरबे ता. पनवेल येथील उपशिक्षिका सत्यदेवी किशनराव बनवसकर भुरे यांना देण्यात आला. यावेळी सोलापूरचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, सुहासिनी शहा अध्यक्ष प्रिसिजन फाउंडेशन, सुजाता लोहकरे सामाजिक कार्यकर्त्या, शशिकांत शिंदे प्रशासकीय अधिकारी मुंबई, सर फाउंडेशनच्या राज्य समन्वयक हेमा वाघ, बाळासाहेब वाघ, सिद्धराम माशाळे , शिवाजी वडते आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सत्यदेवी किशनराव बनवसकर यांनी केलेल्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

# थॅलसेमिया मुक्त महाराष्ट्राकडे एक पाऊल

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

मद. ८ मे २०२५ रोजी राज्यस्तरीय "एक पाऊल थॅलसेमिया मुक्ततेकडे" या मोहिमेचा शुभारंभ महाराष्ट्र शासनाच्या वतीने करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री व कुटुंब कल्याण मंत्री यांच्या हस्ते करण्यात येईल. थॅलसेमिया हा आनुवंशिक रक्तविकार असून, या विकारामुळे शरीरात पुरेश्या प्रमाणात हिमोग्लोबिन तयार होत नाही. त्यामुळे संबंधित व्यक्तींना वारंवार रक्तदाना शिवाय पर्याय राहत नाही. यामुळे शरीरात लोहाचे प्रमाण वाढते व त्यामुळे यकृत व इतर अवयवांवर विपरित परिणाम होतो. यावर उपाय म्हणून IRON CHELATION औषधोपचार करणे




आवश्यक असते.
या मोहिमेच्या माध्यमातून खालील उपाययोजना राबविण्यात येणार आहेत:

1. जिल्हास्तरावर थॅलसेमिया रजिस्टरेशनसाठी विशेष मोहिमा.
2. प्रत्येक जिल्ह्यात नोडल ऑफिसरची नियुक्ती.
3. थॅलसेमिया रुग्णांसाठी विविध आरोग्य तपासण्या जसे की सोनोग्राफी, 2D इको, रक्त तपासण्या.
4. आवश्यक औषधांची नियमित पूर्तता.
5. रक्तसंकलन केंद्रांची उपलब्धता ग्रामीण पातळीपर्यंत.
6. थॅलसेमिया रुग्णांना मदतीचे प्रमाणपत्र वितरण.
7. रक्ताची मागणी व पुरवठा यासाठी रक्तकोशाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे.
8. ARSH, SICKLE CELL, RKSK, ICTC सल्लागारांना प्रशिक्षण.
9. प्रशिक्षण घेतलेल्या सल्लागारांमार्फत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती.
10. पात्र रुग्णांसाठी बोन मॅरो ट्रान्सप्लांटसाठी मदतीची सोय.
11. आवश्यकतेनुसार HLA चाचणी शिबिरे.
12. जनजागृतीसाठी विशेष प्रसार मोहिमा.
13. थॅलसेमिया संबंधित माहिती 104 टोल-फ्री क्रमांकावर उपलब्ध.

या मोहिमेत थॅलसेमिया रुग्ण, त्यांचे पालक, थॅलसेमिया संस्थांचे प्रतिनिधी, तसेच आरोग्य विभागातील अधिकारी मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र शासनाने हा उपक्रम हाती घेऊन थॅलसेमिया मुक्त राज्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. त्या अनुषंगाने वाशिम जिल्यात जिल्हा रुग्णालय या ठिकाणी शुभारंभ होत आहे. जिल्ह्यातील सर्व १ ते ४० वयोगटातील व्यक्तींती आपली तपसणी करून घ्यावी असे आव्हान मा जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे व मा.जिल्हा आरोग्य अधिकारी पी.एस.ठोबरे ,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.रामहरी बेले यांनी केले आहे

## नांदेड जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड दि. 6 मे :- नांदेड जिल्ह्यात 16 मे 2025 च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी मुंबई पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये जिल्ह्यात 16 मे 2025 रोजी मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही. अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.




## महा जॉबफेअर मध्ये 3533 विद्यार्थ्यांची मुलाखत आणि 217 विद्यार्थ्यांची निवड




**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर** रसायनी नजीकच्या शेडुंग येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठात दि. 6 व 7 मे 2025 रोजी पार पडलेल्या महा जॉब फेअर 2025 या रोजगार मेळाव्याला नोकरभरती साठी उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. या दोन दिवसीय मेळाव्यात विविध उद्योग क्षेत्रांतील नामवंत कंपन्यांनी सहभाग घेतला, ज्यात 3533 हून अधिक विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्यात आली आणि 217 विद्यार्थ्यांची तात्काळ निवड करण्यात आली. एकूण 6,723 विद्यार्थ्यांची नोंदणी झालेल्या या मेळाव्याने नवोदित उमेदवारांना रोजगाराच्या संधींसाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ प्रदान केले.

बुधवार दि.7 में रोजी पर्यंत नोंदणीकृत कंपन्याः 104 उपस्थित होत्या.यावेळी एकूण नोंदणीकृत विद्यार्थी: 6,723 होते.यात मुलाखत दिलेले विद्यार्थी 3533 उपस्थित होते.यावेळी मुलाखतीत तात्काळ निवड झालेले विद्यार्थी 217 असून.दुसऱ्या फेरीसाठी निवड झालेले 1534 पात्र आहेत.या मेळाव्यात तंत्रज्ञान, वित्त, विमा, रिटेल, ऑटोमोबाईल, ई-कॉमर्स इत्यादींनी सहभाग घेवून पिल्लई महाविद्यालय रसायनी,बिर्ला कॉलेज (कल्याण), एमजीएम कॉलेज (पनवेल), पिल्लई कॉलेज (पनवेल), एसआयईएस कॉलेज (नेरूळ), प्रसारणीधी सभा (लोणावळा), परुल युनिव्हर्सिटी, आणि सीकेटी कॉलेज (पनवेल) अशा नामवंत संस्थांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, ज्यामुळे उमेदवारांच्या गुणवत्तेत भर पडली. यावेळी भरतीसाठी ॲक्सेन्चर, विप्रो, फ्लिपकार्ट, टेक महिंद्रा, कॅनरा बँक, श्रीराम लाइफ इन्शुरन्स, लेंसकार्ट, मारुती सुझुकी आणि रेवा टेक्नॉलॉजीज यांनी विविध पदांसाठी भरती केली. दरम्यान शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांचा सेतु विद्यापीठाचे कुलगुरू प्राचार्य (डॉ.) केशरीलाल वर्मा यांनी यशाबद्दल सांगितले. फ्लिपकार्ट आणि मारुती सुझुकी यांच्या व्यवस्थित भरती प्रक्रियेचे कौतुक झाले, तर कॅनरा बँक आणि श्रीराम लाइफ इन्शुरन्स यांनी वित्तीय क्षेत्रातील संधी उपलब्ध करून दिल्या. लेंसकार्ट आणि रेवा टेक्नॉलॉजीज यांनी रिटेल व तंत्रज्ञान क्षेत्रात भरती केली.मेळाव्यात केवळ मुलाखतीच नव्हे, तर कौशल्याधिष्ठित इंटर्नशिप्स व करिअर मार्गदर्शन सत्रांचे आयोजन देखील करण्यात आले.या यशस्वी आयोजनामागे कुलगुरू प्रा. (डॉ.) केशरीलाल वर्मा,अध्यक्ष प्रा. (डॉ.) प्रवीण गुप्ता,टीपीओ नारायण खर्जे, सदस्यसचिव डॉ. कल्पना डभाडे,मुख्य सदस्य प्रा. (डॉ.) विकास कुमार, डॉ. अल्का पांडे,कार्यकारी समिती प्रमुख डॉ. महेंद्र इंगोळे आदी उपस्थित होते.

## क्रिडा क्षेत्रात उज्ज्वल कामगिरीची दखल : रेवदंड्याचे दीपक मोकल यांना 'कोहिनूर' राष्ट्रीय पुरस्कार



**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंडा क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल रेवदंड्याचे ज्येष्ठ क्रिडा शिक्षक दीपक गजानन मोकल यांना नाशिक येथील 'दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था' यांच्या वतीने प्रतिष्ठेचा 'कोहिनूर' राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून 4 मे रोजी नाशिकमधील विशाखा हॉल, कुसुमाग्रज स्मारक येथे झालेल्या भव्य समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.या कार्यक्रमात नाशिकचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, खासदार शोभाताई बच्चाव, सायबर कायदा तज्ज्ञ ॲड. अदैत चव्हाण, संपादक मंदार फडके, मिसेस युनिव्हर्स व मिसेस दुबई ज्योती केदारे, अभिनेते पवन चोरे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. संस्थेचे अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे यांच्या हस्ते आणि ज्योती केदारे यांच्या सहकार्याने दीपक मोकल यांना स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ प्रदान करून गौरवण्यात आले.रेवदंडा येथे वास्तव्यास असलेले दीपक मोकल यांचे मूळ गाव पेण तालुक्यातील बेनवले असून, त्यांनी 30 वर्षांहून अधिक काळ क्रिडा शिक्षक व प्रशिक्षक म्हणून सेवा बजावली आहे. सेवा निवृत्तीनंतरही ते डायरेक्ट व्हॉलीबॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांचे जनरल सेक्रेटरी म्हणून कार्यरत आहेत. मोकल यांनी आतापर्यंत 22 राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवले असून, कबड्डी, खो-खो, हॅण्डबॉल, ॲथलेटिक्स आणि कॅरमसारख्या खेळांचा ग्रामीण भागात प्रचार-प्रसार केला आहे.राष्ट्रीय कबड्डी पंच म्हणून त्यांनी महाराष्ट्रासह तामिळनाडू, बिहार, पंजाब, पाटणा आणि पतियाळा येथे काम पाहिले आहे. त्यांच्या यशस्वी वाटचालीसाठी त्यांना 'रायगड भूषण', 'राज्य क्रीडारत्न', 'राष्ट्रीय क्रीडारत्न', 'आदर्श जिल्हा क्रीडा पुरस्कार', 'प्राईड ऑफ इंडिया', 'ठाणे-मुंबई आगरी पुरस्कार', 'कुलाबा जीवनगौरव' अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. क्रिडा क्षेत्रात दीपक मोकल यांनी दिलेल्या भरीव योगदानाची ही राष्ट्रीय पातळीवरील दखल त्यांच्या कार्यास मोठा सन्मान देणारी आहे.

## अखेर मुंगळा गाववासीयासह महिलां व अनंता कुटे यांच्या समवेत अवैध दारूबंदीसाठी आज पासून मालेगाव पोलीस स्टेशन समोरच शासकीय जागेत आमरण उपोषण.

**दैनिक युवक आधार**
**उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम.**
**गजानन पवार.**



मुंगळा गावात अवैध दारू विक्रीने कहर केला असून दारूपायी अनेकांच्या संसाराची राख रांगोळी झाली आहे. महिलाचा संयम आता संपत आला आहे.
अनेक वर्षापासून अवैध देशी, गावठी दारू बंद करण्याच्या मागणीनंतरही अवैध देशी गावठी दारू खुलेआम सुरू आहे. विक्रीवर आळा बसलेला नाही. संत गाडगेबाबा व्यसनमुक्ती विचार मंचचे संयोजक अनंता कुटे, यांनी कायमस्वरूपी दारूबंदी साठी लढा उभारलेला आहे. याबाबत त्यांनी प्रशासनाला अनेक निवेदन दिली आहेत. मात्र पोलिसांनी त्यांच्या निवेदनालां केराच्या टोपलीत टाकल्याने अवैध दारू विक्री झपाट्याने वाढली आहे. अवैध दारू विक्रीच्या विरोधात संत गाडगेबाबा व्यसनमुक्ती विचार मंचच्या वतीने प्रशासनाला 30 एप्रिल पर्यंत अल्टीमेटम देण्यात आला होता. मात्र पोलिसाच्या शून्य कार्यवाहीने अखेर संत गाडगेबाबा व्यसनमुक्ती विचार मंचने आठ मे रोजी मालेगाव पोलीस स्टेशन समोर शासकीय जागेत आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. मुंगळा गावात 100% कायमस्वरूपी त्वरित दारूबंदी लागू करावी. दारूबंदी प्रतिबंधक कायद्यानुसार मुंगळा गावाचा समावेश करावा. आदि मागण्यासाठी आठ मे पासून रखरखत्या उन्हात शांततेत उपोषणाचा एल्गार होणार आहे. तरी पोलीस प्रशासन, उत्पादन शुल्क विभाग, मूग गीळून गप्प का आहे. हे कोडे सामान्य जनतेच्या मनाला पडलेले आहे.

# कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, मंगरूळ नवघरे (ता. चिखली, जि. बुलढाणा) चा घवघवीत निकाल – विद्यार्थ्यांची उज्वल कामगिरी

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मंगरूळ नवघरे, दि. ५ मे २०२५: महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे (विभागीय मंडळ अमरावती) यांनी जाहीर केलेल्या फेब्रुवारी/मार्च २०२५ च्या बारावीच्या परीक्षेचा निकाल आज दिनांक ५ मे रोजी जाहीर झाला. या निकालात मंगरूळ नवघरे येथील कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाने १००% निकाल नोंदवत घवघवीत यश संपादन केले.
महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी आपापल्या शाखांमध्ये अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावले.

**विज्ञान शाखेतील यशस्वी विद्यार्थी:**
1. कु. श्रेया निलेश जाधव – 496 गुण (82.67%)
2. कु. प्रगती विजय अंभोरे – 488 गुण (81.33%)
3. कु. रुपाली भगवान गाडे – 486 गुण (81.00%) कला शाखेतील यशस्वी विद्यार्थी:
1. कु. समीक्षा मुकेश पवार – 451 गुण (75.17%)
2. सुशील रमेश वाकोडे – 420 गुण (70.00%)
3. राधेश्याम रवींद्र इंगळे – 400 गुण (66.67%) वाणिज्य शाखेतील यशस्वी विद्यार्थी:
1. आकाश वसंता ढोले – 419 गुण (69.83%)
2. सुहानी सुखदेव गाडे – 400 गुण (66.67%)
3. कु. निकिता पंढरी रसाळ – 394 गुण (65.67%)

या यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थापक अध्यक्ष श्री. नंदाराम आत्माराम काळे, सचिव सौ. बबिता काळे, संचालक श्री. राजेंद्र मोरे, तसेच प्राचार्य, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. श्री. काळे साहेबांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या सर्व शाखांमधून विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले जात आहे.






# स्व.अरुण पौडवाल कृतज्ञता गौरव पुरस्कार 2025 ज्येष्ठ पार्श्वगायिका उत्तरा केळकर यांना जाहीर !

**दैनिक युवक आधार**
**मुबंई प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध अकॉर्डियन वादक, कुशल संगीत संयोजक आणि प्रतिभाशाली संगीतकार स्व. अरुण पौडवाल यांच्या स्मृति प्रित्यर्थ देण्यात येणारा " कृतज्ञता गौरव पुरस्कार " यंदा सुप्रसिद्ध पार्श्वगायिका उत्तरा केळकर यांना जाहीर झाला आहे. शनिवार दिनांक 10 मे रोजी संध्याकाळी 7 वाजता *सुप्रसिद्ध पार्श्वगायिका पद्मश्री डॉ.*अनुराधा पौडवाल व पौडवाल कुटुंबियांच्या उपस्थिती मध्ये अनुराधाजींच्या शुभहस्ते* पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न होईल. हा समारंभ अनुराधाजींच्या खार (पश्चिम) येथील राहत्या घरी संपन्न होणार आहे. शाल , श्रीफळ , स्मृतिचिन्ह व रोख रक्कम रुपये - 51,000 /- असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. या पुरस्कार सोहळ्याचे हे यंदाचे 28 वे वर्ष आहे. आजवर या पुरस्काराने सन्मानित झालेले मान्यवर पुढील प्रमाणे ....
पार्श्वगायक- जी. मल्लेश , संगीतकार - राम कदम, यशवंत देव , प्रभाकर जोग, दत्ता डावजेकर, अशोक पत्की, संगीत संयोजक - श्यामराव कांबळे, तालवादक - जयसिंग भोई, प्रमोद साने, संतूर वादक - उल्हास बापट, गीतकार - जगदीश खेबुडकर, शांताराम नांदगावकर, वंदना विटणकर, भावगीत गायक - अरुण दाते, गिटार वादक- रमेश अय्यर, सुनील कौशिक, ध्वनिमुद्रक - डी. ओ. भन्साळी, अविनंदन टागोर, हेमंत




पारकर, सत्येन पौडवाल, युवा गायक - गिरीश संझगिरी, चंद्रशेखर महामुनी, मदन काजळे, त्यागराज खाडिलकर...
ज्येष्ठ पार्श्वगायिका उत्तरा केळकर यांचा परिचय -
उत्तरा केळकर यांनी अर्थशास्त्र या विषयात B. A. ची पदवी घेतली असून मुंबई विद्यापीठातून शास्त्रीय संगीताचा डिप्लोमा पूर्ण केला आहे. किराणा घराण्याचे प्रसिद्ध गायक पंडित फिरोज दस्तूर यांच्या कडे त्यांनी शास्त्रीय रागदारी संगीत शिक्षण घेतले तर सुगम संगीताचे शिक्षण मराठीमधील ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव व श्रीकांत ठाकरे यांच्याकडे घेतले. त्यांच्या गायन कारकिर्दीला 53 वर्षे पूर्ण झाली असून या कालावधीमध्ये आजवर त्यांनी 12 विविध भाषांमध्ये 425 हुन अधिक चित्रपटांसाठी, 650 हुन अधिक कैसेट्स व सीडीज साठी तसेच अनेक शॉर्ट फिल्म्स, जाहिराती व जिंगल्स साठी पार्श्वगायन केले आहे. त्यांच्या गायन कारकिर्दीवर आधारित "उत्तर रंग" हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले असून त्यांनी त्यांच्या गायनाचे देशात व परदेशात अनेक जाहीर कार्यक्रम सादर केलेले आहेत.



**उत्तरा केळकर यांची गाजलेली काही गीते -**

01 सत्यम शिवम सुंदरा - सुशीला - राम कदम
02 अग नाच नाच राधे - गोंधळात गोंधळ - विश्वनाथ मोरे
03 झन झन नन छेडील्या तारा - हळदी कुंकू - विश्वनाथ मोरे
04 भन्नाट रानवारा - कशासाठी प्रेमासाठी - सुधीर मोघे
05 मंदिरात अंतरात तोच - धाकटी सून - सुधीर फडके
06 गडद जांभळ भरलं आभाळ - एक होता विदुषक - आनंद मोडक
07 येशील येशील राणी - पोरींची कमाल बापाची धमाल - यशवंत देव
08 कुणीतरी येणार येणार ग - अशी ही बनवा बनवी - अरुण पौडवाल
09 बहिणाबाई ची गाणी - यशवंत देव
10 देवांचाही देव करितो - आई - विश्वनाथ मोरे
11 बिलन शी नागीन निघाली - परिश ठाकूर
12 अशी चिक मोत्याची माळ - परेश शाह
13 चला जेजुरी ला जाऊ - नवरा माझा नवसाचा - जितेंद्र कुलकर्णी

**मिळालेले सन्मान व पुरस्कार -**
महाराष्ट्र राज्य शासनाचा "सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका पुरस्कार" - 2 वेळा
सूर सिंगार संसद चा प्रतिष्ठित "मिया तानसेन पुरस्कार" उमेद पुरस्कार, कोकण रत्न पुरस्कार, महाराष्ट्र रत्न पुरस्कार, राम कदम पुरस्कार आणि महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार इ.
**प्रसिद्धी जनसंपर्क : राम कोंडीलकर**
**मो. ८०८०८२२३८५**

## सुरगाणा तालुक्यात वादळी वारा व विजेच्या कडकडाटासह पाऊस व गारपीट



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : राजेंद्र टोपले,**
**वांगण सुळे, सुरगाणा**

काल नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुका व परिसरात दुपारी चार वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. त्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. अनेक ठिकाणी गारांचाही मोठ्या प्रमाणात वर्षाव झाला. त्यामुळे आंबा फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी शेतात काढणीसाठी आलेला गहू वादळी वाऱ्याने आडवे पडले तसेच खळ्यावर काढून ठेवलेला गहुही भिजला. तालुक्यातील वांगण सुळे येथील शेतकरी एकनाथ लक्ष्मण टोपले व गावातील इतर शेतकऱ्यांच्या आंबा फळबागेचे नुकसान झाले आहे. तर काही घरांचे कौले, पत्रे उडाले . आदिवासी बांधवांच्या घरकुलाचे बांधकाम सुरू आहे. त्या बांधकामामध्ये बऱ्याच लाभार्थ्यांनी मातीपासून विटा तयार केल्या होत्या त्या सर्व विटा पावसाने भिजून विरघळून गेल्या आहेत. तसेच काही विटा विटभट्टीमध्येभाजण्यासाठी भट्टी तयार केली होती ती या वादळी पावसाने विझली असून त्या विटा कच्च्या पक्क्या आहेत. जनावरांसाठी साठवून ठेवलेला चारा, तनस मोठ्या प्रमाणात भिजला आहे. तसेच तालुक्यात इतरही ठिकाणी अचानक पावसाची वादळी वारा व विजेच्या कडकडाटासह मान्सूनपूर्व हजेरी लावल्याने जनजीवन विस्कळीत झाले. तर काही ठिकाणी रस्त्यावर झाडेही मोडून पडले. या अचानक अवकाळी पावसाच्या हजेरीने शेतकरी वर्ग धास्तावला आहे.

# दादर-माहीम परिसरात अवकाळी पाऊस

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः- मयुर प्रकाश धुरी**

काल संध्याकाळी उशिरा दादर व माहीम परिसरात अचानक वादळवाऱ्यासह अवकाळी पावसाची सुरुवात झाल्याने नागरिकांची मोठी धावपळ उडाली. विजांच्या कडकडाटासह आलेल्या या पावसामुळे काही काळातच रस्ते ओलेचिंब झाले. अचानक आलेल्या या हवामान बदलामुळे रस्त्यांवर वाहतूक विस्कळीत झाली असून अनेकांनी आडोशाला आश्रय घेतला.नागरिकांनी सावध राहावे आणि सुरक्षित ठिकाणी थांबावे, असा सल्ला प्रशासनाकडून देण्यात येत आहे.



# पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालय नवीन ठिकाणी स्थलांतरीत

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO), पनवेल हे कार्यालय 5 मे 2025 पासून प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल,व्हॅली शिल्प को-ऑप. हौ.सो.,बिल्डिंग क्र. एच-1, दुसरा मजला,सेक्टर 36, खारघर नोड,ता. पनवेल, जि. रायगड – 410210 ई-मेलः RTO.46-MH@GOV.IN येथे नवीन ठिकाणी स्थलांतरित झाले आहे. नवीन पत्त्यावर सर्व व्यवहार सुरळीतपणे सुरु झाले असून नागरिकांना सर्व संबंधित कामांसाठी नवीन पत्त्यावरच संपर्क साधावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल जयंतकुमार पाटील यांनी केले आहे.

# सणसर गटात जय भवानीमाता पॅनलची प्रचारास सुरवात

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

श्री छत्रपती कारखान्याच्या निवडणुकीसाठी सणसर गटातील उमेदवार शिवाजीराव निंबाळकर,रामचंद्र निंबाळकर,सुचिता सपकळ, गणपत कदम यांनी सणसर गावात घर टू घर जाऊन पत्रक देऊन प्रचार सुरु केला असून लोकांचा उत्सपूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे. यावेळीशिवाजीरावनिंबाळकर,प्रशांतनिंबाळकर,रोहितनिंबाळकर,जैनुद्दीन कबीर,आबासाहेब निंबाळकर शंभूराजे निंबाळकर,औदुंबर पाटील,सागर जाधव,रोहित पाटील,शुभम सपकळ,हनुमंत कदम,अक्षय निंबाळकर, अभिजित निंबाळकर,संजय साळुंखे,आदी सणसर परिसरातील सभासद व कार्यकर्ते उपस्थित होते.




# न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाचा ९१.३५ निकाल जाहीर

## यावर्षी मुलींनी मारली बाजी

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः**
**-जितेंद्र खोडे**

राळेगावः-येथील नामवंत न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय यांचा यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राहिली आहे. एकूण 81 विद्यार्थी या परीक्षेस बसले होते, त्यापैकी 74 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, शाळेचा एकुण निकाल 91.35% इतका लागला आहे. यावर्षीही 12 वीच्या परीक्षेत मुलींनीच बाजी मारली आहे. शाळेतील गुणवंत विद्यार्थिनींचे तपशील पुढीलप्रमाणे प्रथम क्रमांक कु. गौरी सुनील माळवे 72.00%, द्वितीय क्रमांक कु. पूनम सुरेश सिडाम 67.50%, तृतीय क्रमांक कु. अबोली विश्वास वैद्य 64.67%, शाळेतून 11 विद्यार्थी प्रथम श्रेणीत, 52 विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर 11 विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. ग्रामीण पार्श्वभूमी असतानाही विद्यार्थ्यांनी दाखवलेली शैक्षणिक गुणवत्ता कौतुकास्पद असून, शाळेतील नियमित सराव परीक्षा, शैक्षणिक उपक्रम यांचा यामध्ये मोठा वाटा आहे. या उल्लेखनीय निकालाबद्दल न्यू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बी. के. धर्मे, सचिव सौ. डॉ. अर्चना धर्मे, मुख्याध्यापक विजय कचरे, उपमुख्याध्यापक सुरेश कोवे, पर्यवेक्षक सूचित बेहरे, प्रा. प्रवीण चौधरी, प्रा. रवी चिकाटे तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# ८ मे रोजी साजरा होणार टेरव भवानी मंदिराचा १४ वा वर्धापनदिन.

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुरते**
**चिपळूण प्रतिनिधी**

श्री क्षेत्र टेरव येथील आद्यशक्ती कुलस्वामिनी श्री भवानी वाघजाई शक्तीपिठाचा चौदावा वर्धापन दिन सोहळा गुरुवार दिनांक ८ में २०२५ रोजी मोठ्या दिमाखात साजरा होणार आहे. यानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. आदिशक्ती कुलस्वामिनी श्री भवानी जगदंबा माता, अबाल वृद्धांचे श्रद्धास्थान, महाराष्ट्राचे कुलदैवत आणि ग्रामदैवत श्री वाघजाई मातेसह इतर देवतांची स्थापना अंदाजे ५०० वर्षापूर्वी सन १५१० ते १५१२ या काळात टेरव येथे करण्यात आली. हिरव्यागार देवरहाटीमध्ये वसलेल्या या मंदिराची दुरावस्था झाल्यामुळे सन



१८३९ साली सदर मंदिराचा पहिल्यांदा जीर्णोद्धार झाल्याची इतिहासात नोंद आहे. त्यानंतर या जुन्या लाकडी कौलारु मंदिराच्या नवीन वास्तू उभारणीचा संकल्प करुन दिनांक ८ मे २०११ रोजी या नूतन मंदिराचे उद्घाटन व कलशारोहण श्रीमंत जगतगुरु शंकराचार्य, करवीर पीठ, कोल्हापूर, यांचे शुभहस्ते आणि ह.भ.प. भारती महाराज, आळंदी देवाची यांच्या उपस्थितीत करण्यात आले. सदर मंदिर स्थापत्यशास्त्राच्या कलात्मकतेचा एक उत्कृष्ट नमुना असून, आई भवानी वाघजाई मातेचे दर्शन घेणाऱ्या भाविकांना आंतरिक बळ मिळते तसेच मंदिराच्या प्रांगणात आगळं वेगळं समाधानही लाभते. १४ व्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवार, दिनांक ८ मे २०२५ रोजी सकाळी अभ्यंगस्नान, अभिषेक, नवचंडी याग, नवचंडी हवन, महिलांसाठी हळदी कुंकू समारंभ, दुपारी महाआरती, महाप्रसाद व संध्याकाळी महाआरती इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाने सदर देवस्थानास पर्यटनाचा क दर्जा तसेच तीर्थ क्षेत्राचा ब दर्जा बहाल केला आहे. कोकणातील दाक्षिणात्य पद्धतीने बांधलेले हे भव्यदिव्य मंदिर जिल्ह्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील पर्यटनाचा केंद्रबिंदू ठरले आहे. नागमोडी रस्ता, भव्य मंदिर, भैरी भवानी, वाघजाई, महालक्ष्मी, कुलस्वामिनी आणि नवदूर्गांसह इतर देवतांच्या आकर्ष मूर्ती, प्रशस्त उद्यान आणि देवरहाटीतील गारवा यामुळे या ठिकाणी पर्यटक आकर्षित होत आहेत. श्री क्षेत्र टेरव येथील कुलस्वामिनी श्री भवानी - वाघजाई मंदिर हे धार्मिक, अध्यात्मिक केंद्राबरोबरच एक नवीन पर्यटनस्थळ म्हणून विकसित होत आहे. तरी आपण सर्वांनी सदर मंदिराच्या चौदाव्या वर्धापनदिनी सहपरिवार, मित्रमंडळींसह अगत्याने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा आणि उत्सवाचा आनंद द्विगुणित करावा अशी विनंती समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

# पारवा येथे जयस्वाल पेट्रोल पंपाजवळ मृत्यूचा सापळा! प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिकांचा आक्रोश

## पारवा सर्कलमधील जनता रस्त्यावर उतरून मोर्चा काढण्याच्या तयारीत!

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**

**(घाटंजी):** ६ एप्रिल २०२५ रोजी दुपारच्या सुमारास दोन दुचाकींच्या धडकेत तिघे जण गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करून पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे हलविण्यात आले आहे. यापूर्वी झालेल्या अपघातांमध्ये दोघ गंभीर जखमी झाले आणि एक बळी गेला आहे. तरीही संबंधित विभागाने कोणतीही ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे. पारवा सर्कल येथील जयस्वाल पेट्रोल पंपाजवळ अपघातांची मालिका सुरूच आहे, आणि प्रशासनाच्या घोर दुर्लक्षामुळे नागरिकांचा संयम आता तुटत चालला आहे. मंगळवारी झालेल्या भीषण अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले असून, एकाच ठिकाणी मागील एका महिन्यात तब्बल चार अपघात झाले आहेत. या जीवघेण्या वळणावर योग्य उपाययोजना न केल्याने तीन निष्पाप जीवांना आपले प्राण गमवावे लागले आहेत, असा संतापजनक आरोप नागरिक करत आहेत. हजारो वाहनांची वर्दळ असलेल्या या मार्गावर गतिरोधक किंवा दिशादर्शक फलक लावण्याची साधी गरजही संबंधित विभागाने पूर्ण केलेली नाही. त्यामुळे भरधाव वेगात येणाऱ्या वाहनचालकांना धोकादायक वळणाचा अंदाज येत नाही आणि ते अपघातांना बळी पडतात. आता आणखी किती बळी गेल्यावर प्रशासन जागे होणार, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.



परिसरातील नागरिकांनी तातडीने या धोकादायक जागेची पाहणी करून ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. केवळ दिखाऊ पाहणी न करता, तातडीने गतिरोधक बसवणे, योग्य सूचना फलक लावणे आणि आवश्यक असल्यास वळणाच्या रचनेत बदल करण्याची मागणी जोर धरत आहे. निष्काळजीपणामुळे झालेल्या या दुर्दैवी घटनांसाठी जबाबदार कोण, असा आक्रोश आता पारवा सर्कलमध्ये घुमत आहे.

**अपघातांची मालिका थांबणार कधी?**

आणखी किती निष्पाप जीवांचा बळी गेल्यावर या 'मृत्यूच्या सापळ्या'वर उपाययोजना केली जाईल, याचे उत्तर आता संबंधित विभागाला द्यावेच लागेल. जर या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केले गेले, तर पारवा सर्कलमधील जनता रस्त्यावर उतरून मोर्चा काढण्याच्या तयारीत आहे, असा इशारा देण्यात आला आहे.

# तुकडोजी महाराज जन्मोत्सवानिमित्य वाढोणा बाजार येथील बाल वारकरी भजन मंडळ द्वितीय पारितोषिकाचे मानकरी

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः**
**-जितेंद्र खोडे**



राळेगावः-वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जन्मोत्सव सोहळा श्री क्षेत्र यावली शहीद ता. जि. अमरावती वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज संस्थापित श्री गुरुदेव सेवा मंडळ ही संकल्पना सामान्यांना असामान्य घडविणारी, व्यक्तिमत्व विकारा वृध्दिंगल करणारी संजीवनी आहे, या प्राप्त शक्तीवरच गावाल-समाजात- देशात व विश्वात सुख शांती नांदू शकेल. या विना मार्ग कुणी नाही शांतीचा' हे सत्य दर्शन आहे. याचा चहुदिशा प्रचार प्रसार व्हावा म्हणून श्री गुरुदेव सेवा मंडळाची विचार धारा व नियमावली याच्या प्रशिक्षणार्थ, श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या ज्येष्ठ आचार्या द्वारे मार्गदर्शन व्हावे या करिता राष्ट्रसंत जन्मोत्सव (ग्रामजयंती) दि. २३ एप्रिल ते ३० एप्रिल २०२५ या सप्ताहात शिबीराचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यात श्री संत तुकाराम महाराज वारकरी बाल भजन मंडळ यांनी द्वितीय क्रमांक पटकावला तसेच प्रोत्साहन पर बक्षीस उत्कृष्ट पावली साठीचे सुद्धा बाकीसह प्राप्त केले यावेळी बक्षीस स्वीकारतांना मंडळाचे अध्यक्ष श्री, किशोर महाराज वाटगुरे, विणेकरी श्री. प्रवीण महाराज राजपोले व मंडळाचे मृदूंग वादक श्री, सुजल महाराज सोनवणे यांनी मंचकावर जाऊन बक्षिसे स्वीकारले

नोटः-जय राक्षसी वृत्ती बळावे, गर्जुनी भूमीवरी। तब दे निसर्गा गालना, त्या दैवीशक्ती श्रीहरी ।। तुकवधा म्हणे परिवर्तना, गुरुदेव तैसा जाहला । गुरुदेव सेवा मंडळ हा जन्म भारती लाभला ।।

# महेश माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय रुई नालकोल दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी यशाचे शिखर कायम

## आम्ही कोणत्याही क्षेत्रात कमी पडू शकत नाही बारावीच्या निकालातून मुलींनी सिद्ध केले

**दैनिक युवक आधार**
**मारुती सत्रे**
**आष्टी प्रतिनिधी**

कला शाखा
97.36/
1. खिळे श्रुतीका सतीश -73.50/
2. शिंदे प्रियंका पांडुरंग-66.83/
3. अनभुले साक्षी धनंजय-66.50

एकूण 38 विद्यार्थ्यांपैकी 37 विद्यार्थी उत्तीर्ण. त्यापैकी 15 विद्यार्थी विशेष प्राविण्य, व 22 विद्यार्थीश्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले

विज्ञान शाखा -97.36
1. कनेरकर स्नेहा मच्छिंद्र -90.17
2. जगताप वृषाली संजय कुमार-89.33
3. वाळके रोहन जयसिंग -89.17



एकूण97 विद्यार्थ्यांपैकी 96 विद्यार्थी उत्तीर्ण त्यामध्ये65 विद्यार्थी विशेष गुणवत्ता व 31 प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे माजी आमदार तथा शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भीमरावजी धोंडे साहेब ,तसेच पोलीस निरीक्षक राजेंद्र ( आबा ) बनसोडे डॉ.अजय दादा धोंडे, प्रशासन अधिकारी श्रीविधाते सर, श्री राऊत सर, माऊली बोडखे सर, शेंडे सर, शाळेचे प्राचार्य श्री. यू.. एस. भुकन सर, तोडकर सर, परदेशी सर , शेलार सर, एक शिंगे सर, कोकरे सर, बोडके सर, काळे सर, शिंदे सर, गांजुरे सर, वाघुले सर, तुषार काळे सर, संदीप काळे सर, बोडके सर, गिलचे मॅडम, खिलारे सर, अमोल धोंडे, अशोक गांजुरे, मासाळकर, रुई नालकोल सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे

# माणगावच्या डंपिंग ग्राउंडवरून जैविक खतनिर्मितीकडे वाटचाल; बायो मायनिंग प्रकल्पास सुरुवात - संतोष माळी

दैनिक युवक आधार
माणगाव वार्ताहर

माणगाव नगरपंचायतीच्या वतीने डंपिंग ग्राउंडवर सुमारे 15 हजार मेट्रिक टन जमा झालेल्या घनकचऱ्याचे जैव खते तयार करण्यासाठी 'बायो मायनिंग' उपक्रमाची भव्य सुरुवात महाराष्ट्र राज्याच्या 66 व्या वर्धापन दिनी दि.1 मे 2025 रोजी सुरुवात करण्यात आली. या उपक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी मुख्याधिकारी संतोष माळी, उपनगराध्यक्षा हर्षदा सोंडकर, सभापती सुशीला वाढवळ व अन्य मान्यवर उपस्थित होते.



प्रकल्पासाठी अत्याधुनिक यंत्रसामग्री कार्यान्वित करण्यात आली असून यात कचऱ्याचे वर्गीकरण, प्रक्रिया व पुनर्वापर या सगळ्या टप्प्यांवर स्वयंचलित पद्धतीने काम केले जाणार आहे. हे यंत्र दिवसरात्र कार्यरत राहणार असून, अंदाजे एक ते दीड महिन्यांत सर्व जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करून खताच्या स्वरूपात रूपांतरित केला जाणार आहे. मुख्याधिकारी संतोष माळी यांनी सांगितले की, "हा प्रकल्प 'लेगसी वेस्ट' म्हणजेच जुन्या साचलेल्या कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी महत्त्वाचा असून, रोजच्या साधारण 10 टन नवीन कचऱ्याचेही प्रक्रियेत रूपांतर करण्यात येणार आहे. तयार होणारे जैविक खत हे महसूल उत्पन्नाचे साधन ठरणार असून, डंपिंग ग्राउंड संपूर्णपणे स्वच्छ करण्यात येईल." नागरिकांच्या दृष्टीने हा उपक्रम आरोग्यदायी, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक माणगाव घडवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. स्थानिक प्रशासनाच्या या उपक्रमाचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे.

# उद्योग ऊर्जा"- "नॅशनल अवॉर्ड ऑफ एक्सलन्स"या पुरस्काराने सन्मानित!!!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी**
**-गुरुनाथ तिरपणकर**



आर्मी कन्या *अंजली साखरे* आणि *संतोष साखरे* संचालित *AS VALIANT FAME ICON FOUNDATION* या प्रतिष्ठित संस्थेच्या वतीने, *"उद्योगऊर्जा"* या संस्थेचा नुकताच *"नॅशनल अवॉर्ड ऑफ एक्सलन्स"* देऊन गौरव करण्यात आला. MSME उद्योजकांच्या विकासासाठी आणि नेटवर्किंगचे भक्कम व्यासपीठ उभे करण्यासाठी गेल्या सहा वर्षांहून अधिक काळ केलेल्या समर्पित समर्पित कार्याचा हा यथोचित सन्मान झाला आहे. हा गौरव सोहळा भायखळा येथील *लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात* अत्यंत उत्साहात पार पडला. विशेष म्हणजे हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी *"उद्योगऊर्जा"* संस्थेच्या सक्रिय, तेजस्वी आणि प्रेरणादायी महिला सदस्यांनी व्यासपीठ गाठून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हा बहुमान स्वीकारला. *हा केवळ पुरस्कार नाही तर महिलाशक्तीच्या उद्योग सहभागाचे, नेतृत्वाचे आणि कर्तृत्वाचे प्रतीक आहे.* या कार्यक्रमाचे नेतृत्व संस्थेच्या अनुभवी मार्गदर्शक *चित्रा राऊत मॅडम* आणि *सुसंवादक अरुण सोनवणे सर* यांनी प्रभावीपणे पार पाडले. त्यांच्यासोबत व्यासपीठावर *आरती चोरगे, आसावरी नगरदेवळेकर, विजयशिला सावंत-तांबे, सुषमा शिर्के, शमिका मुणगेकर, छाया गचके, मीना पपनोई, मृणाल भट, लता शिरसाट, उल्का तेंडुलकर, मिनल दिल्लीकर* या कार्यक्षम महिला उद्योजकांची उपस्थिती सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली. *उद्योगऊर्जा* संस्थेने गेल्या ६ वर्षांत ऑनलाईन व ऑफलाईन माध्यमातून शेकडो मिटिंग्स, ट्रेनिंग्स आणि नेटवर्किंग कार्यक्रमांचे आयोजन करून हजारो MSME उद्योजकांना मार्गदर्शन, संधी आणि ऊर्जा दिली. या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित म्हणजे एकत्रित *₹१०.५० कोटींचा व्यवसाय!* या यशामागे फक्त उपक्रम नाहीत, तर आहे एक ध्येय, एक जिद्द, एक बांधिलकी, आणि एक विचार आहे आणि तो म्हणजे – *"प्रत्येक उद्योजक, कोट्याधीश उद्योजक व्हावा!"* या निमित्ताने *उद्योगऊर्जा* संस्थेचे प्रमुख संघटक आणि प्रेरणास्त्रोत *ब्रॅंडबॉन्ड निलेश सर* यांनी MSME उद्योजकांना आवाहन केले की, नेटवर्किंग माध्यमातून आपल्या ओळखी वाढवा, प्रशिक्षण घ्या, नेतृत्वगुण विकसित करा, आपला व्यवसाय भक्कम करा व त्या माध्यमातून एकंदरच आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी अधिकाधिक MSME व्यावसायिकांनी संस्थेमध्ये सहभागी होऊन आपला व संस्थेचा सर्वांगीण विकास करावा.*चला भेटूया, परस्परांना "ऊर्जा" देऊया...* असे म्हणत तब्बल साडेसहा वर्षे लहान-मध्यम व्यवसायिकांसाठी एक मजबूत संघटन उभारणाऱ्या आणि सध्या संपुर्ण महाराष्ट्रात *"गर्जा महाराष्ट्रऊर्जा महाराष्ट्र!!!"* या स्फूर्तिदायक घोषणेच्या साथीने *"एक उद्योजक, कोटी उद्योजक!"* म्हणत *"प्रत्येक उद्योजक, कोट्याधीश उद्योजक व्हावा..."* यासाठी ऑनलाईन-ऑफलाईन सतत प्रयत्नशील असणारी *उद्योगऊर्जा* संस्था सध्या आपला *7 वा सप्तरंगी वर्धापनदिन* उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्याची तयारी करत आहे. *उद्योजकतेला ऊर्जा देणारी "उद्योगऊर्जा" चळवळ आता प्रत्येक व्यावसायिकाच्या सहभागाची वाट पाहते आहे.* *संपर्क* 8828 717 041, 8984 848222

# मालेगाव येथे खरीप हंगाम पूर्व शेतकरी कार्यशाळा संपन्न.! तालुका कृषी अधिकारी मालेगाव - कैलास देवकर.




**दैनिक युवक आधार**
**उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम.**
**गजानन पवार.**

**मालेगाव :-** येथे दि. 6 मे रोजी आज खरीप हंगाम 2025 पूर्व तयारीच्या अनुषंगाने मालेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी तालुकास्तरीय शेतकरी कार्यशाळा आज उत्साहात पार पडली. तालुका कृषी अधिकारी कार्यालय मालेगाव आयोजित करण्यात आलेली ही कार्यशाळा तालुक्यातील मुख्य तहसील सभागृह कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे उदघाटन मालेगाव रिसोड आमदार अमित झनक यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून वाशिम जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस. ह्या होत्या. तर मालेगाव तहसीलदार दीपक पुंड, अरिफ शहा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वाशिम, अनिसा महाबळे प्रकल्प संचालक आत्मा, तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना आगामी खरीप हंगामातील पीक योजना, हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञान, जैविक शेती, खत व कीड व्यवस्थापन यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विविध शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, शेतकरी गटातील शेतकरी व कृषी सहायक, यांचाही कार्यशाळेत सहभाग होता. यावेळी संदिप घुगे, गणेश उंडाळ, गजानन शिंदे, बबलू जैन, विनोद घुगे, संजय मांडवगळे, प्रिया पाठक, मनीषा घुगे, अजिंक्य मेडशीकर सह तालुक्यातील राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी व शेतकरी बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थीती होती. शेतकऱ्यांना कृषी विभागातील विविध योजनेची माहिती अमोल नवघरे यांनी उपस्थिती शेतकऱ्यांना दिली. कार्यशाळेच्या शेवटी शेतकऱ्यांच्या शंका समाधान सत्रात तज्ज्ञांनी त्यांच्या अडचणींवर उपाय सांगितले. शेतीत विज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढविण्यासाठी अशा कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे मत अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शुभम वाळुकर मंडळ कृषी अधिकारी तसेच आभार प्रदर्शन धनंजय शितोळे यांनी केले.

## बाजारभाव

| | |
|---|---|
| सोने | ₹ ९७,२०० (१० ग्रॅम) |
| चांदी | ₹ ९६,८९० (१ किलो) |
| डॉलर | ₹ ८४.४५ -१५ पैसे |
| सेन्सेक्स | ८०,६४१.०७ -१५५.७७ |
| निफ्टी | २४,३७९.६० -८१.५६ |

## निवडक

### अनिल राजबंशी MATEXILचे उपाध्यक्ष

**मुंबई :** अनिल राजबंशी यांची MATEXIL (मॅन-मेड अँड टेक्निकल टेक्सटाइल्स एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल) चे नवीन उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली आहे. MATEXIL ही प्रमुख निर्यात प्रोत्साहन परिषद आहे. जी मॅन-मेड फायबर टेक्सटाइल्स-फायबर, यार्न, फॅब्रिक, मेड-अप्स आणि तांत्रिक वस्त्रांच्या निर्यातीस चालना देण्यासाठी कार्य करते. राजबंशी हे सध्या रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडमध्ये अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. भारतीय मॅन-मेड फायबर टेक्सटाइल्स उद्योगातील त्यांचा व्यापक अनुभव आहे. राजबंशी म्हणाले, "मॅन-मेड फायबर टेक्सटाइल्स हे भविष्य आहे आणि या क्षेत्राच्या प्रगतीसाठी योगदान देण्यास मी उत्सुक आहे."

### सिंबायोसिस सेंटरतर्फे सर्टिफिकेट कोर्स

**पुणे :** सध्याच्या इएसजी रिपोर्टिंगच्या गरज वाढत आहे. त्यामुळे सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंग, पुणे यांनी 'इएसजी मॅनेजमेंट व रिपोर्टिंग' या विषयावर विशेष सर्टिफिकेट कोर्स सुरू केला आहे. प्रथमच इएसजी मॅनेजमेंट आणि त्याच बरोबर याच विषयाचे रिपोर्टिंग एकत्र शिकवले जाणार आहे. या कोर्सचा कालावधी ६ महिन्यांचा आहे. ईएसजीचा परिचय, पर्यावरणीय शाश्वतता, सामाजिक जबाबदारी व सहभाग, गव्हर्नन्स व नियामक अनुपालन, तांत्रिक नवकल्पना आदींचा अभ्यासक्रमात समावेश असेल.

### विद्यापीठाकडून ब्लॉकचे उद्घाटन

**मुंबई :** भारतातील सर्वात उंच शैक्षणिक ब्लॉक असलेल्या महात्मा गांधी शैक्षणिक ब्लॉकच्या भव्य उद्घाटनासह व्हीआयटी-एपी विद्यापीठाने एक महत्त्वाचा टप्पा गाठला. ४५ मीटर उंच आणि ७.६८ लाख चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेला महात्मा गांधी शैक्षणिक ब्लॉक आधुनिक स्थापत्य आणि शैक्षणिक नवोपक्रमाचा पुरावा आहे. या अत्याधुनिक सुविधेत प्रगत वर्गखोल्या, व्याख्यान हॉल, गॅलरी जागा आणि ७०० आसनांचे सभागृह समाविष्ट आहे.

### स्कोडाच्या ब्रँड संचालकपदी आशिष गुप्ता

**मुंबई :** स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने देशातील उच्च व्यवस्थापनात बदल करताना स्थानिक प्रतिभेवर भर देत आशीष गुप्ता यांची स्कोडा इंडियाचे ब्रँड डायरेक्टर म्हणून नेमणूक केली आहे. गुप्ता यापूर्वी फोक्सवॅगन पॅसेंजर कार्सचे ब्रँड डायरेक्टर होते. त्यांनी पेट्र जनेबा यांच्याकडून कार्यभार स्वीकारला आहे. तर नितीन कोहली यांची फोक्सवॅगन पॅसेंजर कार्सचे ब्रँड डायरेक्टर म्हणून नियुक्ती झाली. ते यापूर्वी ऑडी इंडियाच्या सेल्स आणि ऑपरेशन विभागात कार्यरत होते. आशिष गुप्ता यांना वाहन क्षेत्राचा २० वर्षांहून अधिक काळ अनुभव आहे. त्यांनी १२ वर्षं स्कोडा फोक्सवॅगन कंपनीत विविध पदांवर काम केले आहे.

# तणावात बाजार

## सेन्सेक्स १५५ अंकांनी घसरला




### बाजारात अस्थिरता वाढू शकते

मोतीलाल ओसवाल फायनान्शियल सर्व्हिसेसचे संशोधन प्रमुख (वेल्थ मॅनेजमेंट) सिद्धार्थ खेमका म्हणाले की, भारत आणि पाकिस्तानमध्ये भूराजकीय तणाव वाढला आहे. त्यामुळे बाजारात अस्थिरता वाढू शकते. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या व्याजदराच्या निर्णयावर लक्ष आहे.

**मुंबई :** भारत आणि पाकिस्तानमध्ये वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी सावध पवित्रा स्वीकारला आहे. बँकिंग व तेल कंपन्यांच्या समभागांच्या नफावसुलीमुळे मंगळवारी सेन्सेक्स १५५ अंकांनी घसरला.

सेन्सेक्स १५५.७७ अंकांनी घसरून ८०६४१.०७ वर बंद झाला. दिवसभरात सेन्सेक्स ३१५.८१ ने घसरून ८०.४८१.०३ पर्यंत घसरला होता, तर निफ्टी ८१.५५ अंकांनी घसरून २४,३७९.६० वर बंद झाला.

विश्लेषकांनी सांगितले की, अमेरिकन फेडरलच्या धोरणात्मक निर्णय व अमेरिका-चीन व्यापार चर्चेवर सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृह खात्याने सर्व राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना सुरक्षाविषयक मॉक ड्रिल करण्याचे आदेश दिले आहेत. देशातील ३०० नागरी संरक्षण जिल्हे व संवेदनशील अणुऊर्जा प्रकल्प, लष्करी तळ, तेल शुद्धीकरण कारखाने, जलविद्युत प्रकल्प आदींमध्ये मॉक ड्रिल करण्यात आले. यात हवाई हल्ला सतर्कता सायरन, हल्ला व बंकर्सची स्वच्छता आदींचाही समावेश होता.

इटर्नल, टाटा मोटर्स, एसबीआय, अदानी पोर्ट्स, एनटीपीसी, इंडसइंड बँक, बजाज फायनान्स, एशियन पेंट्स, ॲक्सिस बँक, सन फार्मा आदी कंपन्यांचे समभाग घसरले. भारती एअरटेल, टाटा स्टील, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, हिंदुस्तान युनिलिव्हर, नेस्ले, मारुती आदी कंपन्यांचे समभाग वधारले.

जिओजित इन्व्हेस्टेमेंट लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर म्हणाले की, गेल्या काही सत्रात शेअर बाजारात वधारणा झाली होती. मात्र भारत-पाकिस्तान सीमेवरील तणावामुळे गुंतवणूकदार सावध झाले आहेत. यंदाच्या तिमाहीतील महसूल कमी होण्याची भीती आहे. त्यामुळे बाजारावर परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच गुंतवणूकदारांचे भारत-अमेरिकेसोबत द्विपक्षीय चर्चेवर बारीक लक्ष आहे. तसेच अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या निर्णयावर लक्ष आहे. येत्या काळात व्याजदरात कपातीची शक्यता आहे.

एप्रिलमध्ये भारताचे सेवा क्षेत्र किंचित वधारले आहे. कारण सेवा क्षेत्राच्या ऑर्डरमध्ये वधारणा झाली आहे.

एचएसबीसी इंडिया सर्व्हिसेस पीएमआय बिझनेस इंडेक्स ५८.७ वर एप्रिलमध्ये पोहोचला आहे. मार्चमध्ये तो ५८.५ होता. याचाच अर्थ सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे.

बीएसई स्मॉलकॅप निर्देशांक २.३३ टक्के, मिडकॅप निर्देशांक २.१६ टक्क्याने बंद झाले. बांधकाम ३.४९ टक्के, ऊर्जा २.६४ टक्के, सेवा २.५३ टक्के, उद्योग २ टक्के, कॅपिटल गुड्स १.७१ टक्के, कंझ्युमर ड्युरेबल्स १.५९ टक्क्यांची घसरण झाली. केवळ वाहन व तंत्रज्ञान कंपन्यांच्या निर्देशांकामध्ये वधारणा झाली.

शांघाय, हाँगकाँगचा शेअर बाजार वधारणा झाली. युरोपियन व अमेरिकन बाजार घसरले.

परदेशी वित्तसंस्थांनी सोमवारी ४९७.७९ कोटी रुपयांचे समभाग विकले. तर ब्रेंट क्रूडचा दर ६१.८५ डॉलर प्रति पिंप झाला.

# भारत-ब्रिटनमध्ये होणार मुक्त व्यापार

## दोन्ही देशांनी केली घोषणा

**नवी दिल्ली :** भारत आणि ब्रिटनमध्ये बहुप्रतीक्षित मुक्त व्यापार करार झाला आहे. या करारानंतर दोन्ही देशांनी याबाबतची घोषणा केली.

या व्यापार करारानुसार, जास्तीत वस्तू व सेवांवरील टॅरिफ हटवण्याची तरतूद केली आहे. या करारानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करून हा ऐतिहासिक मैलाचा दगड असल्याचे सांगितले. यामुळे दोन्ही देशांतील द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत होतील. भारत व ब्रिटनने मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. दोन्ही देशातील अर्थव्यवस्थामध्ये व्यापार, गुंतवणूक, विकास, रोजगारात वाढ होणार आहे.

**बोरिस जॉन्सन यांच्या काळापासून प्रयत्न**

ब्रिटनचे माजी पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्या काळापासून मुक्त व्यापार करारासाठी भारत व ब्रिटन प्रयत्नशील होते. या काळात अनेक गुंतागुंतीच्या मुद्द्यावर काम करण्याचे प्रयत्न अधिकाऱ्यांनी केले. भारतीयांसाठी व्हिसा, कार व स्कॉच व्हिस्की आदी ब्रिटनच्या निर्यातीवर टॅरिफ व ब्रिटनमधील कार्बन बॉर्डर ॲडजेस्टमेंट मॅकेनिझम, कार्बन वस्तू आदींचा समावेश होता.

### भारत टॅरिफ कमी करणार

भारत ब्रिटनमधून ९० टक्के आयातीवर टॅरिफवर कपात करणार आहे. त्यातील ८५ टक्के वस्तू येत्या १० वर्षात टॅरिफमुक्त होतील. भारत व्हिस्की व जीनवरील टॅरिफ ७५ टक्के करणार आहे. तसेच वाहन टॅरिफ १० टक्के करणार आहे.

# रुपया यंदा ८५ ते ८७ पर्यंत स्थिर राहील



## एसबीआयचा रिपोर्ट

### अमेरिकेत मार्चमध्ये घटली महागाई

अमेरिकेतील आर्थिक परिस्थितीबाबत या अहवालात नमूद केले की, मार्च २०२५ मध्ये अमेरिकेतील महागाई घसरून २.४ टक्के झाली. तर एप्रिलमध्ये गैर-कृषी क्षेत्रात नवीन १.७७ लाख नोकऱ्या निर्माण झाल्या. तर बेरोजगारीचा दर ४.२ टक्के स्थिर राहिला. आतापर्यंत टॅरिफचा परिणाम अजूनही अमेरिकेतील महागाईला बसलेला नाही. येत्या काही महिन्यात महागाईचे आकडे वाढू शकतात.

**मुंबई :** २०२५ मध्ये अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया ८५ ते ८७ रुपयांदरम्यान स्थिर राहू शकतो. जागतिक व स्थानिक कारणांमुळे रुपयाला मजबुती देऊ शकतात. येत्या काही महिन्यात डॉलर व रुपया विनीमय दराला स्थिरता लाभू शकेल, असे एसबीआयच्या रिपोर्टमध्ये म्हटले आहे.

रिपोर्टमध्ये नमूद केले की, विनीमय दर यंदा ८५ ते ८७ रुपया दरम्यान स्थिर राहील. त्यामुळे रुपयाला समर्थन मिळू शकेल. डीएक्सवाय निर्देशांक घसरण्याची शक्यता आहे. कारण अमेरिकन अर्थव्यवस्थेवर टेरिफचा परिणाम दिसू लागेल. डॉलर घसरल्याने भारतासारख्या विकसनशील देशातील चलनांना फायदा होणार आहे. तर मे २०२६ पर्यंत एक डॉलरची किंमत ८५.८७ ते ८६ रुपये होऊ शकते. याचाच अर्थ येत्या काळात डॉलरच्या तुलनेत रुपयाच्या किमतीत फारसा बदल होणार नाही.

# अदानी पॉवरला उत्तर प्रदेशात १५०० मेगावॉटचे कंत्राट

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशात १५०० मेगावॉट विजेची वीजपुरवठ्याचे कंत्राट अदानी पॉवरला मिळाले आहे. येत्या २५ वर्षांसाठी प्रति युनिट ५.३८ रुपये दर आहे.

उत्तर प्रदेश सरकारच्या मंत्रिमंडळाने ऊर्जा खरेदी कराराला मान्यता दिली आहे. हा करार अदानी पॉवर व उत्तर प्रदेश ऊर्जा कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये झाला आहे. उत्तर प्रदेशने १६०० मेगावॉट औष्णिक वीज प्रकल्पातून वीजपुरवठ्यासाठी निवीदा जारी केल्या होत्या. यात ऊर्जानिर्मिती प्रकल्प राज्यात उभारणे गरजेचे होते.

# बँक ऑफ बडोदाला ५०४८ कोटी नफा




**नवी दिल्ली :** सार्वजनिक क्षेत्रातील बँक ऑफ बडोदाने मार्च रोजी संपलेल्या तिमाहीत ५०४८ कोटी रुपयांचा नफा कमवला आहे. गेल्यावर्षी याच कालावधीत बँकेला ४८८६ कोटी रुपयांचा नफा झाला होता.

बँकेला तिमाही ३५,८५२ कोटी रुपये उत्पन्न मिळाले. गेल्यावर्षी बँकेला याच कालावधीत ३३,७७५ कोटी रुपये उत्पन्न मिळाले होते. बँकेला व्याजातून ३०,६४२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. गेल्यावर्षी बँकेला २९,५८३ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते.

निव्वळ व्याजातून मिळणारे उत्पन्न बँकेला ११०२० कोटी रुपये मिळाले. गेल्यावर्षी बँकेला निव्वळ व्याजातून मिळणारे उत्पन्न ११७९३ कोटी रुपये मिळाले होते. गेल्यावर्षीच्या तुलनेत बँकेच्या निव्वळ व्याज उत्पन्नात घट झाली.

बँकेचे घाऊक बुडीत कर्ज २.२६ टक्के झाले. मार्च २०२४ रोजी ते २.९२ टक्के होते, तर निव्वळ बुडित कर्ज ०.५८ झाले. २०२४ मध्ये ते ०.६८ टक्के होते.

तर भांडवली पर्याप्तता रेशो १७.१९ टक्के होते. गेल्यावर्षी भांडवली पर्याप्तता रेशो १६.३१ टक्के होता.

२०२४-२५ या पूर्ण आर्थिक वर्षात बँकेच्या नफ्यात १० टक्के वाढ झाली. तो १९५८१ कोटी रुपये झाला. गेल्यावर्षी तो वर्षभरात १७७८९ कोटी रुपये झाला होता.

बँकेचे संपूर्ण उत्पन्न वर्षभरासाठी १,३८,०८९ कोटी रुपये झाले. गेल्यावर्षी ते १,२७,१०१ कोटी रुपये होते.

बँकेच्या संचालक मंडळाने प्रति समभाग ८.३५ रुपये लाभांश देण्याची शिफारस केली.



# दुबईत मराठी भाषिकांचा आवाज बुलंद

## भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे प्रतिपादन

**दुबई :** व्यवसाय आणि नोकरीनिमित्त दुबईत राहणाऱ्या दीड लाख मराठी भाषिकांसाठी नुकतीच महाराष्ट्र परिषदेची स्थापना झाली. महाराष्ट्र कौन्सिलच्या 'महा हेल्पलाइन' आणि 'युनायटेड महाराष्ट्र प्लॅटफॉर्म' या उपक्रमांमुळे दुबईस्थित मराठी माणसांचा आवाज अधिक बुलंद होईल, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले.

संयुक्त अरब अमिरातीत राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी स्थापन केलेल्या इंडियन पीपल्स फोरम या संस्थेची अंगिकृत संस्था म्हणून ही परिषद कार्यरत राहणार आहे. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत दुबईत महाराष्ट्र कौन्सिलची मुहूर्तमेढ रविवारी रोवली गेली.

यावेळी चव्हाण म्हणाले की, महाराष्ट्र सरकार आणि आयपीएफ यांच्यातील समन्वय वाढेल, तर काही कारणाने अडचणीत सापडलेल्या यूएईस्थित मराठी लोकांना त्यांच्या मातृभाषेतून मदत उपलब्ध व्हावी या उद्देशाने 050 365 HELP ही महा हेल्पलाइन सेवा २४ तास उपलब्ध आहे. त्याद्वारे शासकीय आणि कायदेशीर मदतीसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळेल.

# पेटीएमला ५४५ कोटी तोटा

**नवी दिल्ली :** 'पेटीएम' ब्रँडची मालक फिनटेक कंपनी 'वन ९७ कम्युनिकेशन'ला मार्च रोजी संपलेल्या चौथ्या तिमाहीत ५४५ कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. गेल्यावर्षी कंपनीला ५५१ कोटी रुपयांचा तोटा झाला होता. कंपनीच्या महसुलात १५.७ टक्क्याने घट झाली असून तो १९११.५ कोटी झाला. तर मार्च २०२४ मध्ये कंपनीला २२६७.१ कोटी रुपये महसुल मिळाला.

# सुंदरम होम फायनान्स ६ हजार कोटी उभारणार



**चेन्नई :** सुंदरम होम फायनान्स ही कंपनी सध्याच्या आर्थिक वर्षात ६ हजार कोटी रुपये उभारणार आहे. ही रक्कम एनएचबी, बँक कर्ज, रोखे व मुदत ठेवी आदीतून उभारली जाणार आहे.

सुंदर होम फायनान्सने जानेवारी ते मार्च दरम्यान ७१.५७ कोटी रुपये नफा कमवला आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत कंपनीच्या नफ्यात २६ टक्के वाढ झाली आहे. गेल्यावर्षी कंपनीला ५६.८० कोटी रुपये नफा झाला होता. कंपनीची ३१ मार्च २०२५ अंतर्गत ॲसेट अंडर मॅनेजमेंट १७४७० कोटी रुपये वाढली. गेल्यावर्षी ती १३,८१२ कोटी रुपये होती.

कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डी. लक्ष्मीनारायणन म्हणाले की, छोट्या छोटया शहरात आर्थिक विकास मोठया प्रमाणात होत आहे. त्यामुळे गृह वित्त क्षेत्रात मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. गृहनिर्माण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर मागणी वाढणार आहे. आम्ही शाखा व मनुष्यबळ विस्तारावर अधिक भर देणार आहोत. आम्ही देशातील मोठ्या शहरात उपस्थित आहोत. पण, यंदाच्या वर्षात आम्ही द्वितीय व तृतीय श्रेणीच्या शहरांमध्ये विस्तार करण्याचे ठरवले आहे.

३१ मार्च २०२५ पर्यंत कंपनीने नवीन व्यवसायात २२९ कोटी रुपयांचे वितरण केले. यात छोटया उद्योगांसाठी कर्ज व किफातशीर घरांचा समावेश आहे.

# प्रेस्टीज इस्टेट १० हजार कोटी गुंतवणूक करणार

**नवी दिल्ली :** प्रेस्टीज इस्टेट प्रोजेक्ट लिमिटेड येत्या सहा वर्षांत १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. या गुंतवणुकीतून कंपनी गाझियाबादला ६२.५ एकर जमीन टाऊनशीप प्रकल्प उभारेल. दिल्ली-एनसीआर बाजारात घरांची मागणी वाढत आहे. बंगळुरू येथील प्रेस्टीज समूहाने दिल्ली एनसीआरच्या बाजारपेठेत प्रवेश करण्याची घोषणा नुकतीच केली होती. कंपनी दिल्लीत हॉटेल व कार्यालय उभारत आहे.

'प्रेस्टीज सिटी, इंदिरापुरम' हे आमच्या पहिल्या प्रकल्पाचे नाव आहे. आम्ही दिल्लीतील बांधकाम क्षेत्रात मोठे बदल घडवायचे आहेत. आम्हाला या क्षेत्रातील चांगला विकासक म्हणून नावलौकिक तयार करायचा आहे. कंपनीने दर्जा व वेळेत घरांची डिलिव्हरी करण्यावर लक्ष्य केंद्रित केले आहे. कंपनी १० दशलक्ष चौरस फूट विभागात ४०४१ घरे व ८ लाख चौरस फुटांचा शॉपिंग मॉल उभारणार आहे.

पहिल्या टप्प्यात कंपनी ३४२१ अपार्टमेंटचा प्रकल्प उभारणार आहे. त्याच्या विक्रीतून ९ हजार कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे, तर संपूर्ण प्रकल्पातून १२ हजार कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे.

# येस बँकेची जपानी बँकेसोबत डील होणार

**मुंबई :** येस बँकेची जपानची सुमीतोमो मित्सुई बँकिंग कॉर्पोरेशनसोबत डील होण्याचे जवळजवळ निश्चित झाल्याचे समजते. हा खरेदी करार झाल्यास हा भारतातील सर्वात मोठा बँकिंग क्षेत्रातील करार ठरेल.

येस बँक व सुमितोमो बँकेच्या कराराचे मूल्य १.७ अब्ज डॉलर (१४ हजार कोटी) असण्याची शक्यता आहे. सुमितोमो येस बँकेचे थेट २६ टक्के समभाग खरेदी करेल किंवा २६ टक्के हिस्सेदारी खरेदी करून ओपन ऑफर आणेल. त्यामुळे येस बँकेचे नियंत्रण सुमितोमो बँकेच्या हाती येईल. जपानची दुसऱ्या क्रमांकाची मोठी बँक सुमितोमो गेल्या वर्षीपासून येस बँकेतील सर्वात मोठी गुंतवणूकदार भारतीय स्टेट बँक व रिझर्व्ह बँकेसोबत चर्चा करत आहे.

## इंडिया एनर्जी स्टोरेज सोल्युशनचा अहवाल

# येत्या ८ वर्षांत भारतात १२३ दशलक्ष विजेची वाहने असतील

**नवी दिल्ली :** भारतात दिवसेंदिवस विजेच्या वाहनांचा खप वाढत आहे. येत्या २०३२ पर्यंत भारतात १२३ दशलक्ष विजेची वाहने रस्त्यावर धावतील, असा अंदाज इंडिया एनर्जी स्टोरेज अलायन्स ॲण्ड कस्टमाईज्ड एनर्जी सोल्युशन्सने व्यक्त केला.

२०७० पर्यंत भारताने शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे लक्ष्य ठरवले आहे. त्यामुळे विजेच्या वाहनांना स्वीकारणे गरजेचे आहे. २०३० पर्यंत भारताने ३० टक्के विजेची वाहने चालवण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष ठेवले आहे.

विजेच्या वाहनांच्या विक्रीत सरकारी धोरणांच्या मदतीचा मोठा हात आहे. सरकारने 'फेम-२' ही योजना लागू केली होती. त्यामुळे विजेच्या दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहनांना प्रोत्साहनपर रक्कम दिली जात होती. तसेच सार्वजनिक चार्जिंग सेवा उभारण्यासाठी भांडवली अनुदान दिले गेले.

२०३० पर्यंत भारताने दुचाकी व तीनचाकी वाहनांचे प्रमाण ८० टक्के, चारचाकी खासगी वाहने ३० टक्के तर व्यावसायिक कारचे प्रमाण ७० टक्के, तर विजेच्या बसचे प्रमाण ४० टक्क्यांपर्यंत नेण्याचे ठरवले आहे. हे लक्ष्य नीती आयोगाने तयार केले आहे.

सध्या चार चाकी विजेच्या कारचे भारतातील प्रमाण ६ टक्के तर विजेच्या बसेसचे प्रमाण १ टक्क्यापेक्षा कमी आहे.

सीईएस संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विनायक वाळिंबे म्हणाले की, २०३२ पर्यंत भारतातील विजेची वाहनांची संख्या ४९ दशलक्ष (कमीत कमी) तर सध्याचा विजेच्या वाहन विक्रीचा वेग कायम राहिल्यास ते १२३ दशलक्ष वाहनांपर्यंत पोहचेल, असे त्यांनी सांगितले.



### चार्जिंगचे मोठे आव्हान

२०२४ च्या अहवालानुसार, भारतातील २२०,००० चार चाकी वाहने ही 'टाईप-२' एसी चार्जरवर अवलंबून आहेत. हे चार्जर निवासी संकुलात बसवले आहेत. भारतात ७६ हजार सार्वजनिक व अन्य ठिकाणी चार्जिंगची सोय आहे. त्यांची एकत्रित क्षमता १.३ गिगावॉट आहे. भारताची वाहन चार्जिंगची क्षमता १२ ते २८ पट वाढवण्याची गरज आहे. २०३२ पर्यंत ती २.१ दशलक्ष चार्जिंग स्टेशनपर्यंत वाढवणे गरजेचे आहे. त्यासाठी २३ गिगावॉट वीज लागेल. त्या क्षमतेच्या पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील, तर विजेच्या बस व ट्रकची संख्या अनुक्रमे ४ लाख ५० तर ११ लाखांवर जाण्याची शक्यता आहे. या क्षेत्राची वाढती गरज लक्षात घेऊन सार्वजनिक चार्जिंग क्षेत्राची क्षमता वाढवणे गरजेचे आहे. यासाठी गुंतवणूक व धोरणात्मक सहाय्य लागेल. भारत हा विजेच्या वाहनांमध्ये नेतृत्व करू शकतो. त्यातून पर्यावरणाचा लाभ होऊन आर्थिक विकासाला चालना मिळेल.